# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



श्रीसाईबाबा पुण्यतिथी अंक

ऑक्टोबर १९८०] [किंमत १ रु.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

# श्री साईलीला


श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :
**श्री.क.हि.काकरे**
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री.सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)


## श्रीसाई वाक्सुधा

जनतापाठी चिकटलें मरण ।
एकाहूनि एक अभिन्न ।
मरण जीव प्रकृति लक्षण ।
जीवाचें जीवन ती विकृति ॥५२॥

मरण मारूनि जे उरती ।
पाय काळाचे शिरीं जे देती ।
तयां काय आयुर्दायाची क्षिती ।
अवतरती जे स्वच्छेनें ॥५३॥

— श्रीसाईसच्चरित अध्याय ४३


: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.
दूरध्वनी : ४४३३६१
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

१) संपादकीय — मना सज्जना भक्ती पंथेची जावे
२) ध्यानयोगिनी स्वामी उमानंदांचे शुभाशिष
३) श्रीसाई गजानन — श्री. गणपतराव सामंत
४) साईबाबा मला आकाशाएवढे मोठे वाटतात — कुमार अमोल पितळे
५) चि. परेशची साईभक्ती — सौ. दिपा ढापरे
६) सुंदर ते ध्यान — कु. राजु वायंगणकर
७) शिरडी आणि साईबाबा — कुमारी करुणा यशवंत सहामते
८) साईबाबा माझी माऊली — श्री. प्रभाकर कोळमकर
९) मी शिरडीत काय पाहिले — कुमारी हर्षला छाजेड
१०) मी डेबू बोलतोय — कु. जयदेव प्रणय गुप्ते
११) साईबाबा पुन्हा प्रकटले तर, — कुमारी सुरेखा गोसावी
१२) शिरडीचे श्रीसाईबाबा — कु. राजन डी. पोतनीस
१३) "साई" माझा देव — कु. आशिष वि. हजारे
१४) "बाबांची अगाध लीला" — कु. विलास म. वखारे
१५) माझे श्रीसाईबाबा — कुमारी सुषमा सु. गर्जे
१६) साईबाबा अवतरले तर — कु. संदीप बाबूराव
१७) मी शिर्डीची वारी करतो — कु. संजय ज. बारगळ
१८) अनोखी संध्याकाळ — कुमारी प्रतिभा बळीराम पराडकर
१९) भूपाळी — श्रीमती रुक्मिणीबाई बेंद्रे
२०) माझे गुरु पणजोबा—श्रीसाईबाबा — कु. अलोक तेंडूलकर
२१) मी शिरडीत काय काय बघितले — कु. प्रफुल्ल मा. फणसे
२२) साईबाबा मला खूप खूप आवडतात — दिपक कुमार रेवणकर
२३) बाबा साक्षात्कारी संत — सुरेशकुमार पां. धुरी
२४) माझे शिरडी दर्शन — कु. माधव ब. सामंत
२५) माहेराच्या वाटेवर — डॉ. के. भ. गव्हाणकर


☆ ☆ ☆

## संपादकीय

# मना सज्जना भक्तीपंथेची जावे

● भक्ती ! किती सुंदर शब्द ! जीवन खऱ्या अर्थाने जगायला ह्याच्याएवढी सामर्थ्यवान प्रभावी शक्ती नाही. केवढं तेज आहे या शब्दाभोवती ! की ज्याच्या प्रकाशात शांति समाधानाचे जीवनात प्रसवलेले अंकूर फुलू लागतात नि द्वेष मत्सरादी भावनांची पसरलेली बीजे जळून जातात; किती वजन ह्या शब्दाला. उच्चार केल्याबरोबर मनामध्ये वेगळेच भाव दाटून येतात ! प्रेमाचे उच्च स्वरूप भक्ती. प्रेमाला आविष्कारांचे कोंदण घातले जाते मग ते कुठलेही असो तिकडे काही उणे अधिक पडले तर प्रमाणातही फरक पडण्याचा संभव. पण भक्ती उद्‌भवलेली असली की तिकडे तडा जाण्याची भितीच नको ! त्याला विशिष्ट उंची असते. कारण त्याला अधिष्ठान असते ईश्वरीप्रेरणेचे. सद्‌गुरूंच्याठायी देवतुल्य वाटणाऱ्याठायी हा भाव जडला म्हणजे जीवनाला वेगळीच रूचि येते, गोडी येते.

काय सामर्थ्य वर्णावे ह्या भक्तिभावाचे ? तुकाराम महाराज म्हणतात "भक्ति प्रेमसुख नेणवे आणिका। पंडित वाचका ज्ञानियांसी ॥ १ ॥ आत्मनिष्ठ जरी जाले जीवन्मुक्त। तरी भक्तिसुख दुर्लभ त्या ॥ २ ॥ तुका म्हणे कृपा करिल नारायण। तरि च हे वर्म पडे ठावें ॥ ३ ॥ मात्र हे वर्म आपण ओळखले पाहिजे. म्हणजे देव कृपा करिलच.

परमार्थ साधण्यासाठीं ज्ञान योगादि मार्गापेक्षा भक्तिमार्ग हा आम्हा सामान्यांना सोपा आणि सरळ मार्ग. कुठे धडपड आणि आडवळणे नाहीतच. चुकण्या सवरण्याची भीती नाही. बाबांच्या म्हणण्याप्रमाणे 'श्रद्धा' ठेऊन अगदी संपूर्ण हवाला टाकून राहिले की आरामसे काम ! मात्र त्याच्या जोडीला सबुरी धरून ठेवायला हवी. एवढे साधले की भक्तिचे सुकाणू हातात धरून ही जीवनरूपी होडी संसार सागरातून निश्चितपणे तरून नेऊ शकू असा आगळा आत्मविश्वास उत्पन्न होतो. त्या सागरातल्या दुःखरूपी खडकांचे वाळूत रूपांतर होते असेच वाटायला लागते.

पाऊस वादळांना तोंड देण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. सगळेच कसे आनंदमय शीतल, मऊ, चैतन्यमय, हिरवेगार, ईशस्वरूप !

खरंच; जीवन सुखमय करण्याचे 'भक्ती' हेच प्रभावी साधन आहे. माणसाच्या सुखदुःखाची खरी निर्मिती त्याच्या मनातून होते. 'मन' हेच सर्वांला कारण. त्या मनाला धडे देताना श्री रामदासस्वामींनी सुरवातीलाच बजावले आहे. "मना सज्जना भक्ति पंथेंचि जावे। तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावे ॥ कारण मनुष्य जन्माचे खरे सार्थक ईश्वर प्राप्तीतच होते. आता आज कालच्या उथळ जीवनात ही सार्थके वेगवेगळी असली तरी त्याला खोली जेमतेम तेव्हढीच! म्हणून ती डचमळतात आणि असमाधानाच्या तावडीत सापडतात, नि मग धावतात शांति शोधायला. दानधर्म करत नाहीतर माळा घालून फिरत, का होईना केव्हातरी उपरती होते, नि अंती देवाचा धावा करायला लागतो. मग सुरवातीलाच का करू नये भक्ती प्रेम ? आपण जेथून आलो तेथे परत जाण्याचा आत्म्याचा स्वभाव आहे. परमात्म्याशी ऐक्य साधणे त्याचा स्थायी भाव आहे. पण आपली प्रकृति त्याला आड येते. मुक्तीच्यापासून दूर जायला लावते. जीव आपल्या मुळस्वरुपापासून बाजूबाजूला होत जातो. मोह पाशात, द्वेष 'मत्सरादी' विकारात गुंतत जातो नि आत्मतत्वाशी विचलीत झाल्यामुळे मूळचे आनंदमय असलेले ते आपले स्वरूप विसरून उगीचच दुःखी कष्टी बनून जातो. स्वार्थाच्या कुंपणात अडकून बसतो. तसे पाहिले तर सर्वच अशाश्वत. पण त्याचा लोभ धरून माणूस माणसापासून दूर जातो, आत्मा आत्म्यापासून पर्यायाने परमात्म्यापासून. त्यामुळे होते पापपुण्याची बेरीज वजाबाकी नि मग जीवात्म्याची अडवणूक. मग शिवात्म्याशी ऐक्य, भेट कशी होणार ? तीच तर साधली पाहिजे. असे संत महात्मे सांगतात नि विचार करता आतून ते पटल्याचा आवाज येतो की, मग त्यासाठी जीवन व्यवहारात काय टिकावू आणि काय टाकावू हे ठरवायला सद्सद्विवेक बुद्धि जागृत ठेवायला हवी. त्याच्यासाठी हवा मनाचा संयम निग्रह, आणि झाला अधिष्ठान पाहिजे जगत्चालकावरच्या श्रद्धेचे. भगवंताच्या लीला समजून घ्यायला मग अर्थातच भक्तिचेच अमृत प्यायला हवे. मग त्या देवेद्वावेपणाची, आपपरभाव भक्तीची कशाचीच बाधा होणार नाही आपल्याला वाढीस लागेल तो परस्परामधला प्रेमभाव नि मग सगळचं आनंदमय !

तेव्हा त्या सच्चिदानंदाची प्राप्ती करून घ्यायची असेल नव्हे ती घ्यायलाच हवी निदान तसे प्रयत्न करायलाच हवेत आपल्याला तर भक्तिच्या मार्गावरून जायला हवेच. म्हणजे मग दुःखरूपी काटे हिरवळ वाटायला लागतात आणि मूळची हिरवळ अधिक हिरवी दिसते. अडचणी, अपयशरूपी दगडधोंडे मातीची ढेकळे होऊन रहातात मूळची माती अधिक मऊ होऊन जाते. झाडे वेली आपले हात अधिक लांब करतात की ज्यामुळे ऊनपावसाचा मारा जाणवत नाही, आणि त्यातच

कुठे टोचलेच, ठेचाळलेच तर रक्ताळत तरी नाही. आणि रक्ताळलेच तर 'हरि-नामा'च्या मलम पट्टीने तावडतोब जखम भरून येते. सगुणध्यानानी दुःख विरून अगदी विसरून जाते. जायलाच हवे !

'नाहीतर तुझ्या नामाचा उपयोग काय?' म्हणून विचारू की आपण देवाला! तेही दृढ भक्तिभावाने हाक मारायची मग 'ओ' देणारच तो आणि नाही दिली तर समजावे की आपली हाकच उणी पडली. हो मला तरी तसच वाटते. तसाच अनुभव येतो. प्रचिती येते. कामाला प्रारंभ बाबांचे नाव घेऊन करायचा अन् करता-नाही तेच 'साई साई' मग यशापयशाची चिंताच वाटत नाही. ईश्वरेच्छा बलियसी ही भावना, काम अवघड, कंटाळवाणी वाटली तरी 'साई साई' म्हणायचे आपो-आप हलके होते. भय, राग, दुःख वाटले, बाबांना सांगितले की झाले हलके.

आपण सर्वजण देवाचीच लेकरे त्यांचेच अंश. पण जन्माला आलो 'कोऽहं कोऽहं' ओरडत, आणि 'सोऽहं' हा मंत्र अजिबात विसरून गेलो. त्याची आठ-वण करून द्यायला संत महात्मे अवतार घेतात. तसाच आपल्या साईबाबांनी घेतला. आणि तोही हिंदु-मुसलमानांचे जातिभेदावरून तंटे चालले असता ऐक्य साधण्या-साठी! अगदी वेळेवर! त्यांची शिकवण आत्मसात केली तर आपला उद्धार किती लवकर करून घेऊ आपण. पण आमचा मीपणा आड येतो ना? तो सोडला तरी अंत-रीची हाक बाबांना पोहोचल्याशिवाय रहात नाही. त्याचा क्वचितच अनुभव येतो.

## बालसाहित्य विशेषांक

श्री साईलीला मासिकाचा हा बालसाहित्याने भरलेला अंक आहे. श्रीसाई-बाबांच्या ६२ व्या पुण्यतिथी निमित्याने प्रसिद्ध होणारा हा अंक मुलांच्या साहित्याने विशेषत्वाने नटलेला आहे व तो तुमच्यासमोर ठेवताना अतिशय आनंद होत आहे.

घरोघरी वडीलधारी माणसे श्री साईबाबांची पूजा अर्चा उपासना जपजाप्य करतात. त्यांचे अनुकरण घरोघरीची मुलेबाळेही करतात. त्यांना पण बाबांविषयी अपार प्रेम वाटत असते. आपल्या वडील मंडळींबरोबर मुले पण शिरडीची वारी करतात शिरडीचे दर्शन व श्री बाबांचे दर्शन सुख अनुभवतात त्यांच्या मनात पण बाबांच्या बद्दलची प्रितीची, आपुलकीची, अत्यादराची भावना सहाजिकच उत्पन्न होते. हीच भावना आज त्यांच्या लेखणीतून तुम्हा आम्हासमोर या अंकातून अगदी प्रथमच छापील स्वरूपात येत आहे. आजची बालके हीच उद्याची साईभक्त म्हणून ओळखली जाणार आहेत. श्रीसाईलीलेच्या जन्मापासून तो आजतागायत गेल्या ५९ वर्षात असा हा बाल अंक निघालाच नव्हता. बाबांना मुले आवडत असत व त्यांनी दिलेल्या प्रेरणेनुसार की काय या अंकाची योजना करून तो प्रसिद्ध करीत आहोत. वाचकांनी या अंकाबद्दलच्या प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात.

# प. पू. ध्यानयोगिनी उमानंद सरस्वतींचे
# बाल साईभक्तांना शुभाशिष



योगपूर्ण तपोमूर्ति, प्रेमपूर्ण सुदर्शनम् ।
ज्ञानपूर्ण कृपामूर्ति, उमानंदं नमाम्यहम् ॥

बाळांनो, या आहेत स्वामी उमानंद सरस्वती, पूर्वाश्रमीच्या त्या कुसुमताई ठकार. विवाहोत्तर त्या सौ. कुसुमताई शर्मा म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. योगाध्ययनात दिर्घकाल घालविल्यामुळेच की काय गुरुदेव मुक्तानंद परमहंस यांनी त्यांना संन्यास दीक्षा देऊन 'स्वामी उमानंद सरस्वती' हे नाव दिले. त्यांचे अध्यात्मिक क्षेत्रातील उच्च स्थान, सिद्धयोग व कुंडलिनी जागृति याबाबतीत त्यांचा अधिकार व भक्तजनांच्या उद्धारासाठी त्यांचे अहर्निश चाललेले महान कार्य तसेच इंग्रजी व मराठीतून चाललेले प्रचंड ग्रंथलेखन पाहून कुणाचेही मस्तक त्यांचे समोर विनम्रच होते. त्यांनी तुम्हाला दिलेला शुभसंदेश पुढे देत आहोत—ताईंचे तुम्हाला शुभाशिष.

ताई म्हणतात—' बालभारतच ' आपले खरे वैभव. भावी पिढीतून गुरूभक्त सिद्धयोगी व योगीनी शक्तीपात कुशल गुरुकृपेने सहज निर्माण होतील. काश्मीर शैविझमचे आद्य आचार्य व सिद्धगुरू दुर्वासमुनी होते. त्यांनी १० दिवसांच्या बाळ कृष्णाला दृक्पाताने शक्तीपात करून त्याची कुंडलिनी जागृत केली, व म्हणूनच बाळपणापासूनच श्रीकृष्णाने अचाट कृत्ये केली.

श्रीसाईबाबा, भगवान नित्यानंद व गुरुदेव मुक्तानंद असेच भावीपिढीला कृपा दृष्टीने अवलोकन तयार करीत आले आहेत. आमच्या गुरुदेव ध्यानमंदिरात गेल्या ५ वर्षात कितीतरी बारशी आम्ही साजरी केली. उमा कुमारी, शांभवी, शांकरी, भैरवी, भैरव, प्रकाश, प्रसाद, सुरेश, रमेश, व जन्माष्टमीला बारसे झालेली नीलेश्वरी अशी अनेक बाल, बालीका मंदिराची नातवंडे आहेत, व भावी काळात गुरुभक्तीचा पंचम पुरुषार्थ करून दाखविण्यास गुरुकृपांकित झाली आहेत.

— स्वामी उमानंद

## श्रीसाईबाबा ६२ वा पुण्यतिथी महोत्सव

सर्व साईभक्तांना कळविण्यात येते की यंदा शिरडी येथे श्रीसाईबाबा ६२ वा पुण्यतिथी महोत्सव शनि. ता. १८, रवि. ता. १९ (दसरा) व सोम. ता. २० अक्टोबर १९८० पर्यंत नेहमीप्रमाणे थाटाने साजरा केला जाईल. सर्व साईभक्तांनी हेच निमंत्रण समजून महोत्सवास हजर राहून संस्थानात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वतोपरीने सहकार्य द्यावे अशी विनंती मे. कोर्टरिसिव्हरसाहेब श्रीसाईबाबा संस्थान शिरडी हे करतात.

# श्रीसाई गजानन

● ● ●

—श्री. गणपत सामंत एम्. ए.
निवासी व्यवस्थापक महालक्ष्मी मंदिर मुंबई

● श्रीसाईबाबांचे नाव भारतातच नव्हे तर परदेशातसुद्धा दुमदुमत आहे. जणू जगातील सर्व रस्ते आज शिरडीप्रत जात आहेत. एवढी प्रसिद्धी, एवढा नावलौकिक, एवढी सत्ता, एवढे भक्त, एवढे सार्वभौमत्व आजपर्यंत कुणाला प्राप्त झाले असेल असे वाटत नाही. जिकडे-तिकडे श्रीसाईबाबांची मंदिरे पहावयास मिळतात व अशा बाबांच्या मंदिराची एवढी झपाट्याने वाढ होत आहे. की ज्याप्रमाणे गणेशमंदिरे व मूर्ति जगभर आढळतात त्याप्रमाणेच बाबांची मंदिरे व मूर्ति लवकरच सर्वत्र पहावयास मिळतील यात संशय नाही. शिरडीला तर माणसांची मुंग्यासारखी रांग लागत आहे व बाबांचे बोल अक्षरशः खरे ठरत आहेत.

आपण देवांची किंवा साधुसंतांची एकमेकाशी तुलना करणे अयोग्य ठरते. राम, कृष्ण, शंकर, गणपती ही एकाच परमेश्वराची विविध रूपे. ज्ञानेश्वर, रामदास, माणिकप्रभू, साईबाबा हे संत म्हणजेच एकाच परमेश्वराच्या विविध प्रतिमा प्रत्येक भक्ताने आपणास हवे असेल ते आराध्य दैवत योजावे.

एकच गोष्ट आपण या भक्तिमार्गात लक्षात ठेवावयास हवी की 'पक्ष बदलू' बनून कदाचित सत्तेची खुर्ची मिळत असेल पण 'देव बदलू' बनून काही मिळत नाही. भक्ती वाया जाते व भक्त स्वतःच फसतो. जगात परमेश्वर आहे असे मानणे श्रेयस्कर असते. आपण त्या परमेश्वराची कोणत्याही एका रूपात आराधना करणे इष्ट.

गणपती एकच पण अपत्य प्राप्तिसाठी, लग्नासाठी व अशाच नवसास पावणारे म्हणून आपण आपले निरनिराळे गणपती मानतो. श्रीसाईबाबा एकच. सर्वच नवसास पावतात पण आज-उद्या वरील प्रमाणे फरक भक्त निर्माण न करोत.

गणेश चतुर्थी हा सण आपण ज्या भावनेने व श्रद्धेने साजरा करतो त्याच प्रमाणे दसरासण साजरा करतो. दसरा म्हणजे साईंचा पुण्यतिथी दिन. त्यात हिंदूंचा सण गणेश चतुर्थीप्रमाणे साईपुण्यतिथी दसरा दिन साजरा व्हावा हीच सदिच्छा.

देव अनेक आहेत पण गणपती देवतास जास्त भक्तगण आहे त्याचप्रमाणे सर्व साधुसंतात श्रीसाईबाबांचा भक्त गण मोठा आहे म्हणूनच असे म्हणावे लागते की श्रीगजाननाने कलियुगात श्रीसाईबाबा म्हणून पदार्पण केले.

हा साईच गजानन गणपतीं ।
हा साईच घेऊनि परशू हाती ॥
करोनि विघ्नविच्छिती ।
निज व्युप्तत्ति करू का ॥
हाचि भालचंद्र गजानन ।
हाचि एकदंत गजकर्ण ।
हाचि विकट भग्नरदन ।
हा विघ्नकानन–विच्छेदक ॥
हे सर्वमंगल मांगल्या । लंबोदरा गणराया ।
अभेदरूपा साई सदया । निजसुखनिलया नेई गा ॥
हे साईनाथ स्वप्रकाश । आम्हा तुम्हीच गणाधीश ।
सावित्रीश किंवा रमेश । अथवा उमेश तुम्हीच ॥
तो हा साईसंतवर । ईश्वराचा दुजा अवतार ।
डोई तयाच्या पायांवर । ठेवितां कृपाकर ठेवील ॥

☆ ☆ ☆


# यंग बॉइज स्पोर्ट क्लब

यंग बॉइज स्पोर्ट क्लब, ॲन्टॉप हिल मुंबई नं. ४०००३७ येथील केंद्रीय कर्मचारी वसाहतीमध्ये श्रीसाईबाबांची पुण्यतिथी दि. १९ ऑक्टोंबर ते २३ ऑक्टोंबर अशी साजरी करणार आहोत. तरी सर्व साईभक्तांनी हेच व्यक्तिगत आमंत्रण समजून तीर्थप्रसादास यावे ही विनंती.

प्रमुख कार्यवाहक

यंग बॉइज स्पोर्ट क्लब मुंबई नं. ३७

श्रीसाईबाबांची पंचधातूची मूर्ती करणारे पार्ल्याचे कल्पक मूर्तीकार श्री. मनोहरपंत पितळे यांचा साईभक्त दुसरा अमोल म्हणतो—

# साईबाबा मला आकाशाएवढे मोठे वाटतात!

—कु. अमोल मनोहर पितळे
पितळे वाडी, हनुमान रोड,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई नं. ५७

* मला श्रीसाईबाबा फार आवडतात. मी रोज सकाळी उठल्याबरोबर आंघोळ करून श्रीसाईबाबांची पूजा करतो. तसेच न चुकता रोज बाबांची उदी पण घेतो. तसेच रात्री झोपताना श्रीसाईबाबांना नमस्कार करून मगच झोपतो. हे सर्व करायला माझ्या वडिलांनी मला शिकवले. कारण माझे वडीलसुद्धा बाबांची रोज पूजा करतात व मला पूजेसाठी फुले ठेवतात. आमच्या घरी बाबांची छान मूर्ति आहे. तिला मुगुट घातला आहे. तिला आम्ही रोज नवीन नवीन कपडे घालतो.

साईबाबा मला रोज शाळेत जाताना दर्शन देत असतात. मी शाळेत जायला निघालो की एखादी रिक्षा, टॅक्सी समोर येते. तिच्यावर साईबाबांचा फोटो असतोच तो पाहिला म्हणजे मला खूप खूप आनंद होतो व खरेच बाबा मला भेटल्यासारखे वाटते.

असाच एक दिवस मी शाळेत चाललो होतो. तो दिवस माझ्या पहिलीच्या परिक्षेच्या निकालाचा होता. शाळेपर्यंत जाईतोवर मला बाबा कुठेच दिसले नाहीत. समोरून येणारी प्रत्येक टॅक्सी रीक्षा मी पहात होतो पण बाबांचा फोटो दिसतच नव्हता. मला खूप वाईट वाटले. माझ्याबरोबर माझी आई मला शाळेत सोडायला आली होती. तिला मी विचारले, 'आई, बाबा अजून कसे दिसत नाहीत?' आई म्हणाली, अरे असे रोज रोज बाबा तुला कसे दिसतील? आई रागाने बोलली म्हणून मी गप्पच राहिलो. इतक्यात शाळेच्या गल्लीत आम्ही वळलो व काय आश्चर्य! समोरून एक टेंपो येत होती' तिच्यावर साईबाबांचा मोठा आशिर्वादाचा फोटो होता' मी सरळ दोन्ही हात जोडून नमस्कार केला व आईला म्हटले 'आई माझा पहिला नंबर येणार' आई म्हणाली "अरे, पहिला येणे म्हणजे खायचे काम नाही हे पार्ले टिळक विद्यालय आहे." थोड्याच वेळात आम्ही शाळेत गेलो. घंटा झाली आई घरी गेली. मोठ्या बाईंनी लाऊड स्पीकरवरून सूचना देण्यास सुरूवात केली

व सांगितले की कु. अमोल पितळे हा पहिलीच्या सर्व तुकड्यातून "पहिला" आला आहे. सर्व मुलांनी टाळ्या वाजवल्या. मला खूपच आनंद झाला, शाळा सुटल्यावर मी आईला म्हटले आहेत की नाही माझे साईबाबा मोठे ! आई साईबाबा मला आकाशाएवढे मोठे वाटतात. खूप खूप आवडतात.

एकदा काय झाले, मी वर्गाचा बाईंनी दिलेला गृहपाठ पूर्ण केला नव्हता म्हणजे चुकून थोडा विसरला होता. नाही तर मी गृहपाठ करायला कधीच विसरत नाही. कारण गृहपाठ केला नाही तर बाई आम्हाला शिक्षा करतात परंतु त्या दिवशी विसरलो होतो. बाई वर्गात आल्या त्यांनी सांगितले की मी आज गृहपाठ तपासणार आहे. मी मनात बाबांचे नाव घेत राहिलो व खूप घाबरुन गेलो. रोज शाळेत जाताना मी माझ्या दप्तरात बाबांचा फोटो व उदीची पुडी कंपॉसबॉक्समधे ठेवतो पण सर्वांच्या समोर मला उदी घ्यायला लाज वाटली. मी नुसते बाबांचे नाव घेतले. व काय मजा झाली बाई गृहपाठ तपासायला विसरल्या. त्यांनी आम्हाला नवीन धडा शिकवायला सुरुवात केली. मधल्या सुटीनंतर बाई पुन्हा आल्या मला वाटले बाई आता गृहपाठ तपासतील पण बाईंनी पाटीवर शब्द घातले म्हणून सर्व मुलांनी पाट्या पुसल्या, अशा रितीने बाबांनी माझे शिक्षेपासून रक्षण केले. मुलांनो, मग सांगा मला साईबाबा का आवडणार नाहीत ? तुम्ही सर्वांनी अशीच श्रद्धा ठेवा साईबाबा तुमचे पण रक्षण करतील, व तुम्हाला पण आवडतील.

---

## साईभक्त कृष्णा मयेकर यांचे निधन

मुंबापुरीतील प्रसिद्ध साईभक्त व चित्रपट क्षेत्रातील एक व्यवसायी श्री. कृष्णा हरीश्चंद्र मयेकर यांचे सोम.ता ८-९-८० रोजी छातीत कळा येऊन एकाएकी देहावसान झाले. मोहन स्टुडिओ, अंधेरी व बॉंबे लॅबोरेटरी येथे ते चित्रपट संकलनाचे काम करीत होते. सध्या ते रॅमनॉड लॅबोरेटरीत चित्रपट संकलनकार्य करीत होते. पौर्णिमा, हसिना मान जायेगी, एक बेचारा, मुकद्दरका सिकंदर देशद्रोही इ. प्रकाशित झालेले व ज्वालामुखी, नमकहलाल, दो गुरू लावारीस इ. आगामी त्यांनी संकलन केलेले चित्रपट होत.

श्रीसाई मृतात्म्यास सदगती देवो.

# चि. परेशकुमार उर्फ पिन्टो याची श्रीसाईभक्ती

★

—सौ. दिपा सतिशचन्द्र ढापरे
पोस्ट मोठी दमण (केंद्रशासित)
स्टे. वापी, पीन कोड नं. ३९६२२०



श्री. परेशकुमार ढापरे, मोठी दमण

[मोठी दमणचे साईभक्त ढापरे कुटुंबातील अवघ्या चार वर्षांच्या परेशकुमारची साईभक्ती पाहून त्यांच्या आईने लिहिलेला हा अगदी आगळा लेख. चि. परेश उर्फ पिन्टो हा मराठी व गुजराथी अशा दोन्ही भाषा सफाईने बोलतो.]

● आमचे ढापरे कुटुंब गेली बऱ्याच वर्षांपासून श्रीसंत चूडामणी सद्‌गुरु श्रीसाईबाबा यांचे भक्त असल्याने दररोज श्रीपूजा, भजन, आरती, पोथी पठण, श्लोक, कपाळास उदी लावणे तसेच रात्रौ समूह कुटुंबीयासह नामस्मरण प्रार्थना करणे हे नित्याचे क्रम आमचे घरी होत असल्याने माझा पुत्र चिं. परेश उर्फ पिंटो हा चार वर्षांचा बालक, दररोज कार्यक्र पाहून व कानी ऐकून, ऐकून, श्रीगणपती स्तोत्रम्, गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णू, गुरुर्देवं महेश्वरः। गुरुसाक्षातपरब्रम्ह, तस्मै श्रीगुरवेनमः॥ जय जय स्वामी साईराज। तारी मज सद्‌गुरुराज ॥ १॥ साई माउली माझे आई। मजला ठाव द्यावा पायी ॥ २। सद्‌गुरुनाथ, साईनाथ, मी अपराधी घ्या पदरांत ॥ तीन शीरे सहा हात। तया माझा दंडवत ॥ कांखेझोळी पुढे श्वान। नित्य जान्हवीचे स्थान ॥ माथा शोभे जटा भार। अंगी विभूति सुंदर ॥ शंख चक्र गदा हाती। पायी खडावा गर्जती ॥ तुका म्हणे दिगंबर। तया माझा नमस्कार॥ नमः परमतत्वाय शाश्वताय महात्मने। शिरडी ग्रामवासाय साई नाथाय नमः ॥

विश्वरुपाय विश्वाय विश्वधाराय तेजसे । सर्व धर्म विलासाय साई नाथायनमः॥ सदासर्वदा योग तुझा घडावा । तुझे कारणी देह माझा पडावा ॥ उपेक्षु नको गुणवंता अनंता । रघुनायका मागणे हेचि आता ॥ तारी मोरया दुःख सागरी ॥ गोसावी नंदन प्रार्थना करी ॥ आत्मया मनी जाण चिद्घना ॥ हे दयानिधे श्रीगजानना ॥ १ ॥ इ० अभंग, भजने, श्लोक प्रार्थना वगैरे आमचे समवेत मुखपाठ बोलू लागलेला आहे.

आमचे येथे कोणतीही खाद्य वस्तू प्रसादरूपी वाटणेची असल्यास ती आगाऊ श्रीसाईपुढे नैवेद्य धरून झाल्यावरच सर्वत्रास देणेचा प्रघात आहे. हे पाहून चि. परेश कोणी काही खाद्यवस्तू खाऊ म्हणून त्यास दिल्यास ( केळी, पेढे, गुळखोबरे, शेंगदाणे, शिरा, बिस्कीटे, चॉकलेट, चणे, मांडनी, वगैरे काही का असेना ) प्रथम श्रीबाबांचे पुढे ठेऊन मगच खावयास घेतो. श्रीसाईलीला मासिकाचे मुखपृष्ठावरील येणारी निरनिराळया प्रसंगाची श्रीबाबांची चित्रे पाहून त्याचे स्पष्टीकरण करून घेणे व ते दुसऱ्या बालकांना दाखविणे तसेच कोठेही श्रीसाईबाबांचा फोटो दिसून आल्यास लगेचच आपले साईबाबा म्हणून सांगणे, व शिलावर बसलेले श्रीसाईबाबांची नक्कल करून दाखविणे वगैरेचा श्रीसाईभक्तीचा छंद असल्याचे पाहून कित्येकांस नवल वाटते. आमची श्रीसाईबाबांचेवर संपूर्ण श्रद्धा, निष्ठा, व सबूरी असल्याने त्यांचीच ही कृपा होय असे आम्ही मानतो. बालवयात बालकांना असे वळण लावावे तसे लागते या दृष्टीने माझी वाचकास नम्र विनंती आहे की, दररोज श्री साईबाबांची भक्ती रूपी प्रार्थना केल्याशिवाय राहू नये.

माझ्या या बालक स्फूर्ती-प्रेरणा लेखास संपादक महाशय यानी, प्रथमच प्रकाशित केला जाणारा ' बाल साहित्य विशेषांकात ' प्रसिद्धीचे स्थान दिल्याबद्दल आभारी आहे.

卐

## साईभक्त हळदणकर यांचे निधन

गोरेगाव मुंबई येथील साईभक्त श्री. दयाळ गणपत हळदणकर यांचे शनिवार दि. ६-९-८० रोजी पहाटे परळच्या के.इ. एम. रुग्णालयात मेंदूतील रक्तस्त्रावाने अचानकपणे निधन झाले. निधन समयी त्यांचे वय ५८ वर्षांचे होते. त्यांच्यामागे पत्नी, दोन पुत्र व एक कन्या व असंख्य मित्रपरिवार आहे. श्रीसाई मृतात्म्यास सदगती देवो !

# सुंदर ते ध्यान

—राजु वायंगणकर
साईनिवास, पेटकिल्ला रत्नागिरी

● सुंदर ते ध्यान बसे शिळेवरी। कर उंचावूनी भक्तशिरी अशी ती बाबांची सुंदर मूर्ती मी देव म्हणून ह्रदयात माझ्या समजुतीपासून पाठविली आहे. कोणाचा देव गजानन तर कोणाचा देव शिवशंकर कोणाचा विष्णू तर कोणाचे मारुतीराय. प्रत्येकाचे दैवत वेगवेगळे माझे दैवत म्हणजे शिरडीचे साईसमर्थ मला आठवते. मी आरती म्हणू लागले ती साईबाबांची. आजही मी पूर्वी इतक्याच भक्तीभावाने दररोज संध्याकाळी साईबाबांची आरती करते. बाबाही माझेकडे कृपा दृष्टीनेच पाहतात. मला त्यांनी एकदा म्हणजे १० डिसेंबर १९७८ ला प्रथम शिर्डीला बोलाविले माझ्या सोबत आई-वडील व माझा मोठा भाऊ सर्व मिळून आम्ही मुंबईवरून ट्रेनने कोपरगावला गेलो व मग टांगा करून शिर्डीला सकाळी १० ला पोहोचले. आवारात भक्तगणांचा प्रचंड लोंढा समाधी मंदीराकडे धाव घेत होता मी एवढी मोठी जत्रा प्रथमच पहात होते. त्यामुळे मनाला खुप आनंद वाटत होता आम्ही आंघोळ केली व प्रथम पुजा साहित्य घेऊन दर्शनासाठी रांगेत नंबर लावला.

मला प्रत्यक्ष बाबांना शिरडीत पहावयाचे होते त्यामुळे केव्हा एकदा रांग संपते व आपण मंदिरात पोहोचतो असे मला झाले होते आईला बाराची आरती मंदिरात करावयाची होती, तिचा तसा नवस होता इच्छे प्रमाणे आम्हाला मंदिरात प्रवेश मिळाला व मग आरतीला सुरवात झाली. मी हातातून नेलेली फुले बाबांचे दर्शन होताच गर्दीतूनच त्यांच्या चरणावर फेकली व ते सुंदर ध्यान डोळे भरून पहातच राहिले सर्व बायका पुरुष मुले आनंदाने देहभान विसरुन आरतीचा आनंद लुटत होते तो सोहळा अपूर्व होता त्याचे वर्णन करताना शब्द अपुरे पडतील आरतीचा घनागजर थांबला प्रसाद मिळाला हळुहळु गर्दी कमी झाली तशी मी अगदी बाबांच्या जवळ जाऊन पायावर डोई ठेवली ज्या भूमीत बाबा फिरत होते हिंडत होते. त्याच भूमित त्यांचे दर्शन घडले मन भरुन आले दुसऱ्या दिवशी आम्ही बाबांचा निरोप घेतला. येताना त्यांना बरोबर आणलेच आता मी शाळेत येता जाताना बाबांना सांगुन जातेच पण परीक्षेच्या वेळी तर त्याना चांगली फुले आणून देते नमस्कार करून मनातून त्यांना सांगते. बाबाही माझ्या मनातले गुपीत जाणतात आणि मला दर वर्षी पास करतातच. असे आहेत बाबा. तुम्ही सर्वांनी त्यांची भक्ती करून पहाच अनुभव येईल बाबांच्या चरणी कोटीकोटी प्रणाम!

# शिरडी आणि साईबाबा

कु. करुणा यशवंत सहामते
सु. पो. चिंचणी, ता. डहाणू,
जिल्हा ठाणे
पिन कोड नं. ४०१५०२

● आपल्या या महाराष्ट्राचे किंवा भारत भूमीचे वैभव म्हणा आपल्या या पावन भूमीला महाराष्ट्रातील व अन्य राज्यातील मोठ-मोठ्या संतांमुळे आपली भूमी पावन झाली व आपण धन्य झालो आहोत. संतानी लोककल्याणासाठी परमार्थ साधून स्वतः कष्टाचे डोंगर उपसले परंतु आपणा सारख्यांना ज्ञानाचा मार्ग सरितेच्या दुथडी प्रमाणे सतत वहावत ठेवला असून आपण त्या ज्ञानाची गोडी चाखतोय, घेतोय, धन्य ते संत. धन्य त्यांची कर्तव्यता व दाक्षिण्य, वर्णावे तेवढेच मला अपूर्ण आहे. अशा या संत भूमीला आणि संताच्या पावन पदास माझे शतशः प्रणाम !

शिरडी साईबाबा ह्या दोन्ही शब्दात जी काही जादू आहे. ती मला आज-पर्यंत कुठल्याच शब्दात आढळली नाही व आढळणार सुद्धा नाही. शिरडीसारखे पवित्र स्थान व साईबाबांसारख्या थोर दैवताची तुलना दुसऱ्या कोणत्या दैवताबरोबर करावी हाच प्रथम विचार पडतो, आणि श्री साईबाबांच्या आगमनाने पुलकीत झालेल्या शिर्डी नगरात रोज मुंगीसारखे लोक बाबांच्या दर्शनासाठी येत आहेत. शिरडी हे नाव देशात तर बाबांविषयी प्रसिद्ध आहेच परंतु पर-प्रांतात सुद्धा शिर्डीची कीर्ती दिवसे-दिवस वाढत आहे. माझ्या प्रिय साईनाथांची ही कीर्ती देशाच्या व परदेशाच्या कानाकोपऱ्यातून दुमदुमून त्यापासून मानवाला माणुसकी, सत्य, श्रद्धा, सबूरी व भूतदया इ. गोष्टी शिकता आल्या पाहिजेत.

ॐ श्रीसाईबाबा म्हटल्याबरोबरच प्रत्येकाला थोडासा आनंद होत असतो व होणारच परंतु माझ्यासारख्या साईभक्तीणीला तर त्याची नवलाईच वाटते, आणि डोळ्यापुढे साईबाबांचे चालते-बोलते, वरदहस्त असणारे चित्र डोळ्यासमोर येऊन उभे रहाते व असे वाटते की बाबांकडे एकटक सतत पहातच रहावे. नास्तीकाला सुद्धा आस्तिकतेचे वेड लावणारे बाबा भुकेल्याला अन्न दे म्हणून सांगणारे बाबा प्राणी मात्रावर दया कर, कुठे कसाही रहा, मी तुझ्या पाठिशी निरंतर उभा आहेच श्रद्धा व सबूरी या दोन मुख्य सिद्धांतावर धीर देणारे व संकटसमयी मदतीचा हात देणारे बाबा इ. कशा प्रकारे व कशी वर्णू मी माझ्या बाबांची श्रीसाईलीला.

ज्या प्रमाणे ऋषीचे कूळ, नदीचे उगम कोणीही विचारु नये त्याचप्रमाणे श्री साईबाबांविषयी उल्लेख कुठल्याच ग्रंथात नाही. शिर्डी नगराचा थोर म्हणून श्री साईबाबांसारख्या थोर संताचे पाय बाल वयातच शिर्डीला लागले. एकदा शिरडी

येथील खंडोबाच्या देवळात लग्नाप्रित्यर्थ शिरडीत आले असताना त्यांना पुजाऱ्याने "आवो साई" या नावाने पुकारले. व तेव्हा पासूनच साईबाबांना 'साई' हे नाव पडले व साईबाबा प्रत्येकांचे आवडते व प्रत्येक घरातील आराध्य व इष्ट दैवत होऊन बसले साईबाबा शिरडीत आल्यापासून शिरडी गावाला एक प्रकारचे वेगळेच वळण लागले व प्रत्येकास बाबांविषयी ओढ वाटू लागली. प्रत्येकजण आपणाला बाबांचा सहवास व बाबांची सेवा कशी करता येईल हाच विचार करु लागला. त्यापैकीच बायजाबाई हिने बाबांची पुष्कळच सेवा केली. प्रथम बाबा रानावनात उन्हातान्हाचे एकटेच फिरत. त्यावेळी बायजाबाई बाबांसाठी बाजरीची भाकरी व झुणका घेऊन रानीवनी बाबांच्या भोजनासाठी शोधत असे व बाबा जेवल्यानंतरच ती स्वतः घास घेत असे. या बायजाबाईंची भक्ती खरच अगाध म्हणता येईल. परंतु बाबांनी तिच्या बरोबरच तिच्या कुळाचे सुध्दा कल्याण केले. बायजाबाई बरोबरच भागोजी शिंदे, काशीराम शिंपी माधवराव व दासगणू यांनी सुद्धा बाबांची भरपूर व मनोभावे सेवा केली. भागोजी हा रक्त पिती परंतु बाबांनी त्याचा तिरस्कार न करता त्याची सेवा आनंदाने

( पान ५५ वर पहा )

**At last the long awaited novel on SAI BABA**

# "A MISSION DIVINE!"

Publishing on Dassera, 19th October 1980

Price Rs. 45/- Postage Rs. 4.50 : No V.P.P.

**THE BEST BOOK ON SAI BABA**

A BOOK FOR ALL SAI CENTRES, EVERY SAI DEVOTEE AND ALL DEVOUT PERSONS IN SEARCH OF PEACE!

Concession for bulk orders over five Copies

Contact: 'PRASHANTI PRAKASHAN',
5, Vasant Apartments, Plot 47, Kastur Park,
Shimpoli Road, Borivali (W.) Bombay 400 092.

# मी शिरडीत काय पाहिले ?

— कु. हर्षला रमेश छाजेड
बुरुडगाव रोड, अहमदनगर.



कु. हर्षला छाजेड

[श्रीसाईबाबा संस्थानचे कोर्टरिसिव्हर साहेब श्री. क. हि. उर्फ काकाजी काकरे यांची ही बारा वर्षाची नात. तिचे वडील श्री. रमेशचंद्र हे नगर येथे सिव्हिल इंजिनियर आहेत. आपल्या शालेय जीवनात कु. हर्षलाने पहिला क्रमांक कधीही सोडला नाही. सध्या ती नगरच्या श्री. भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये आठवीत शिक्षण घेत आहे. पोष्टाची तिकिटे जमविण्याचा तिला छंद आहे.]

● सर्वसामान्यांना एखाद्या महापुरुषाचे आकर्षण वाटते. पण त्यापेक्षा त्याला त्या महापुरुषाने केलेल्या चमत्काराचेच जास्त आकर्षण असते. हा महापुरुष आपल्या मनोकामना पूर्ण करील, त्याचा सहवास घडेल, असा स्वार्थी हेतू मनात असतो. अशा या महापुरुषाचे निर्वाण पण झालेले असो, पण त्याच्या पदस्पर्शाने पावन होवू अशी त्याची भावना असते.

आमच्या शेजारच्या काकू शिरडीला जाऊन आल्या. शिर्डीत गेल्यावर काय काय वाटले, काय काय पाहिले, कसे होते इत्यादी वर्णन त्या रसभरीतपणे करत होत्या. बोलताना आपण शिर्डीतच आहोत याप्रमाणे त्यांना वाटत होते. त्यांचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. साहजिकच आम्हाला शिरडीला जाण्याचे डोहाळे लागले.

आमची बस शिरडी बस स्थानकात शिरली. त्याबरोबर बस शिरत असतानाच दोन-तीन मुले छोटेसे कार्ड आत (खिडकीतून) टाकत होती. मला फार आश्चर्य वाटले. वाचून पाहिले तर 'गुरुस्थान फुल भांडार', तितक्यात दुसरे एक कार्ड हाती पडले, 'साईनाथ फुल भांडार' ही फुलांची दुकाने असून हे लोक आपल्या दुकानातील वस्तूंची विक्री व्हावी म्हणून हे छापील पत्रक टाकत असावेत.

आम्ही आमच्या सामानसुमानाची व्यवस्था लावून थोडी विश्रांती व चहापान झाल्यावर खरेदीसाठी, आरतीसाठी व ऐतिहासिक स्थळांना भेट देण्यासाठी निघालो. नंतर आईने आमच्यासाठी आंगठ्या विकत घेतल्या. तिथं ओळीने दुकाने वसलेली होती. दुकानात अनेक प्रकारच्या वस्तू होत्या. साईबाबांचे फोटो, मूर्ती, चेन, लॉकेटस, आंगठ्या, खेळणी इ. मधूनच फेरीवाले ओरडत होते. 'पेरू रुपया किलो, रुपया किलो.' डाळींबवाली, केळवालीबाई पण होती. नंतर पुढचे दुकान हारांचे होते. नानाप्रकारच्या फुलांचे हार तिथे होते. आम्ही दोन हार घेतले आणि 'समाधीमंदीर कोठे आहे ?' अशी चौकशी करत समाधीमंदीराजवळ येऊन ठेपलो. थोड्याच वेळात आरतीला सुरूवात होणार होती. आम्ही मंदिरात आलो आणि समोर पाहिले, साईबाबांची मूर्ती लोभसवाणी दिसत होती. चेहऱ्यावर एक प्रकारचे तेज होते. दोन्ही बाजूना मंद-मंद समया तेवत होत्या. त्यात मला साईबाबा दिसले. मधूर असा घंटानाद चालू होता. साईबाबांसमोर उदबत्त्या लावल्या होत्या. धूप जाळली जात होती. त्यामुळे कसे प्रसन्न वाटत होते. त्या वातावरणात पावित्र्य होते. वर 'रघुपती राघव राजाराम, पतित पावन सीताराम' हा मंत्र दिसला. इकडे तिकडे झुंबरे लटकाविली होती. मोठमोठे सुंदर दिवे वरती टांगले होते. हे मंदिर संगमरवरीचे होते. आतील व्यवस्था एखाद्या राजदरबारासारखी होती. अशा मंदिरात बसताना मनावर वेगळाच प्रभाव पडत होता. समाधीवर डोके ठेवताना मन खूप शांत होत होते. या समाधीबद्दल अनेक भावना मनात उचंबळून येत होत्या, समाधीतील बाबांचे मस्तक उत्तरेकडे व चरण दक्षिणेकडे आहेत. पायथ्याकडे, समाधीसमोर कमल दलावरच्या संगमरवरी पादुका आहेत. त्यावर भक्तगण भक्तीभावाने फुलांचे हार अर्पण करतात. सर्व चौथरा व त्यावरील कठडे चांदीच्या पत्र्याने मढवले आहेत. समोरच संगमरवरी नंदी आहे त्याच्या शिंगातील छिद्रातून साईबाबांचे दर्शन झाले म्हणजे भाग्यवान असे समजतात. समाधी मंदिरातच बाबांनी वापरलेल्या वस्तू आहेत. ह्या सर्व वस्तू बाबांच्या जीवनातील आठवणी सांगतात.

थोडे पुढे गेल्यावर आम्ही द्वारकामाईत गेलो. साईबाबा हे अंतकाळापर्यंत याच मशिदीत वास्तव्य करुन होते. दिवसा ते इकडे तिकडे जात. पण रात्री वस्तीला ते इथेच येत. इथे असलेल्या चूलीवर बाबा प्रसाद करीत व भक्तांना वाटीत. बाबा ते मिश्रण हाताने ढवळीत असत. देवच ते ! काय अशक्य आहे त्यांना ! इथे बाबा बसत ती शिळा आहे. बाबांची प्रसिद्ध धूनी आहे. गुरूपौर्णिमेला साईबाबांच्या पोथीचे पारायण इथे होते. बाबांची दीपोत्सवाची आवड लक्षात घेऊन आजतागायत दररोज संध्याकाळी पणत्या व समया यांची रोषणाई येथे करतात. जवळच्याच खोलीत बाबांच्या मिरवणूकीचा रथ व पालखी आहे.

आणखी थोडे पुढे गेल्यावर चावडी लागते. चावडीचे लाकडी पार्टीशन घालून दोन भाग केले आहेत. उजवीकडील भागात एक मोठा देव्हारा आहे. तेथील आसनावर बाबांची भव्य तसबीर आहे. त्यापुढे त्यांच्या पादुका ठेवण्यात आल्या आहेत· बाजुला काचेच्या कपाटात नंदादीप तेवत असतो. आढयाला टांगलेल्या देवतांच्या तसबिरी व झुंबरे बाबांच्या काळापासून आहेत· ह्या भागात स्त्रियांना प्रवेश नाही· लाकडी पलंगावर बाबांना शेवटचे स्नान घातले होते. येथे साईबाबा एक दिवसा आड झोपत·

गुरुस्थान हे साईबाबांच्या गुरूंचे स्थान होय. " इथे गुरुवार शुक्रवार जो उद जाळील त्याचे भले होईल " असे, बाबा म्हणत. येथील निंबवृक्षाखाली बाबांच्या सांगण्यावरून खणले असता चार समया तेवत असलेल्या व ताजी फुले पडली होती. या ठिकाणी बाबांनी बारा वर्षे तप केले.

येथील एक प्रसिद्ध गोष्ट म्हणजे 'लेंडी बाग' येथील नंदादीप सतत तेवत आहे. येथे हरीण, ससे मोर आहेत. पूर्वी हे स्मशान होते पण बाबांच्या भक्ताने याचे बागेत रुपांतर केले.

बागेच्या समोरच उत्तरेकडे एक संगमरवराचे सुंदर कारंजे आहे. मध्यभागी आकाशाकडे उंच मान केलेल्या बगळयांची मूर्ती आहे. त्या बगळयाच्या चोचीतून पाण्याचे फवारे उडतात. रात्री यावर रंगीबेरंगी लाईटस् सोडल्यावर ते दृश्य अवर्णनीय दिसते.

कारंजाच्या उत्तरेस बाबांच्या भक्तांच्या समाध्या आहेत. त्याचे बांधकाम कलापूर्ण व अभिनव आहे.

शिरडी या गावात भक्तांना उतरण्यासाठी सेवाधाम, साईनिवास, शांती-निवास इ. प्रकारच्या इमारती आहेत. जेवणाची सोय म्हणून संस्थानातर्फे भोजनगृह बांधले आहे. एकावेळी असंख्य लोक जेवणाचा आस्वाद घेऊ शकतात. भोजनाची व्यवस्था उत्तम आहे.

येथील कामगार, गटारे, संस्थान-परिसर, रस्ते, मंदीर, इमारती, गेस्टहाऊस स्वच्छ करतात. स्वच्छतेच्या बाबतीत पहिला नंबर द्यायला हवा. झोपण्यासाठी गाद्या, उशा व आंघोळींकरता गरम पाणी इ.ची पण सोय चांगली आहे.

अरे हो ! बाबांच्या भक्ताविषयी सांगायचं राहिलेच. काकडारती नंतर मंगलस्नान सार्वजनिक अभिषेक, माध्यान्य आरती, संध्याकाळची आरती इ. कार्यक्रम पाहण्यासारखे असतात. प्रत्येक आरतीच्या सुरुवातीस अपना पाकीट सम्हालना असे सांगणाऱ्या बागवे साहेबांची मजा वाटते. प्रत्येक भक्ताने आपण होऊन म्हणून राबणाऱ्या लोकांची जनहिताविषयीची कळकळ पाहून कौतुक वाटते.

सुविख्यात मराठी लेखिका प्रा. डॉ. सौ. चारुशिला गुप्ते यांचा नातू आफ्रिकेहून लिहितो—

# मी डेबू बोलतोय !

कुमार जयदेव प्रणय गुप्ते,
नैरोबी, द. आफ्रिका



● माझं नाव जयदेव प्रणय गुप्ते. पण मला डेबू म्हणतात. मी खूप छोटा आहे. माझ्या आईबाबांना श्री साईबाबांनी 'प्रसाद' म्हणून मला दिलंय. मला साईबाबा फार आवडतात. मी रडत असलो की माझी आई मला साईबाबांच्या फोटोसमोर नेते, व म्हणते—

" अले, अले जय बाप्पा कला बघू. " आणि मीपण हात जोडतो व हसू लागतो. माझ्या डॅडींचे वडील व आई म्हणजे माझे आजोबा आजी साईबाबांना खूप मानतात. मी पण मोठा झालो की, नेहमी शिरडीला जयबाप्पाला भेटायला जात जाईन.

# साईबाबा पुन्हा प्रकटले तर....

—कु. सुरेखा गोसावी
बेलापूर एज्युकेशन सोसायटीचे
जेठाभाई ठाकरसी सोमय्या हायस्कूल, बेलापूर

● साईबाबांचा सोहळा शिर्डीला चालू होता. सर्व भक्तगणमंडळी साई-बाबांच्या सोहळयासाठी जमली होती. भक्तगणातील काही लोक साईबाबांच्या जीवनातील काही प्रसंगातील बारकावे जमलेल्या श्रोत्यांना सांगत होते. सर्व मंडळी ते ऐकण्यास गुंग झाली होती. साईबाबा हे थोर संतपुरुष होते त्यांनी अनेक चमत्कार केले आहेत. प्रत्येक धर्माचे महत्व सांगितले आहे. परमेश्वर हा एकच आहे असे लोकांना पटवून देण्याचे प्रयत्न केले आहेत.

अशा प्रकारची साईबाबांची माहिती काही लोक जमलेल्या भक्तगणांना सांगत होते इतक्यात एका तेजस्वी प्रकाशाने सर्व उपस्थितांचे डोळे दिपले. सर्वांनी क्षणभर डोळे मिटवून घेतले आणि उघडले तेव्हा काय दिसले ? तर आकाशात अचानक वीज चमकावी त्याप्रमाणे प्रत्यक्ष साईबाबा सिंहासनावर प्रकट झाले होते. या प्रसंगाने साऱ्या भक्तांचा समुदाय विस्मयसागरात बुडून गेला पण दुसऱ्याच क्षणाला सर्वांनी साईबाबांचे दर्शन घेतले.

जे भक्त साईबाबांची माहिती सांगत होते त्यांनी आपले भाषण थांबविले, व साईबाबांनाच त्यांच्या जीवनातील घडलेल्या चमत्कारांचे सत्य स्वरुप स्पष्ट करण्यास सांगितले. साईबाबांनी आपल्या वाणीने आपल्या जीवनातील चमत्कारातील प्रसंग लोकांसमोर उभे केले. त्यांचे चमत्कार ऐकण्यात सर्व लोक गुंग झाले. सर्वांचे कान तृप्त झाले. आकाशात असंख्य चांदण्या, तारे चमकावेत आणि त्यात चंद्र शोभून दिसावा, त्याप्रमाणे साईबाबा त्या शिष्यांच्या मेळाव्यात अलौकिक तेजाने शोभून दिसत होते.

शेवटी समारंभ संपला. सर्वांनी साईबाबांचे दर्शन घेतले. साईबाबांना पाहून लोकांना फार आनंद झाला. आणि सभेच्या शेवटी जाहीर करण्यात आले की, 'साईबाबा शिर्डीलाच चार दिवस मुक्काम करणार आहेत.' ही वार्ता सर्वत्र पसरण्यास वेळ लागलाच नाही.

समारंभाच्या कार्याची चित्रे घेण्यासाठी दूरचित्रवाणीचे लोक शिर्डीला उपस्थित होते. त्यांनी साईबाबांबरोबरच मुक्काम ठोकला. त्याच दिवशी संध्याकाळी दूरचित्रवाणीवर साईबाबांचे दर्शन इतरजनांना घडले आणि मग शिर्डीकडे लोकांची रीघ लागली. माणसांची गर्दी इतकी वाढली की तिथे व्यवस्था ठेवण्यासाठी सैन्य रवाना करण्यात आले. जगाच्या कोनाकोपऱ्यातून साईबाबांवर श्रद्धा असणारे असंख्य लोक शिर्डीला आले. एस. टी. महामंडळाला सुद्धा अनेक जादा गाड्या सोडाव्या लागल्या.

आपल्या भक्तजनांना पाहून साईबाबांना खूप आनंद झाला. आपण येथे नसतानाही आपल्या वर लोकांची इतकी श्रद्धा आहे हे पाहून त्यांना आश्चर्य वाटले. शिर्डीच्या सुधारणा पाहून त्यांना आपल्यावर असलेल्या लोकांच्या श्रद्धेचे महत्व कळले. आपल्या सर्व वस्तू या लोकांनी जतन करुन ठेवल्या आहेत हे पाहून त्यांना खूप आनंद झाला. सध्याची शिर्डी पंढरपूरी किंवा पांडवांची इंद्रप्रस्थ नगरी झालेली पाहून आनंद गगनात मावेनासा झाला.

तेवढयात भारताचे पंतप्रधान व राष्ट्रपती साईबाबांची भेट घ्यावयास आले. त्याचप्रमाणे पत्रकार त्यांची मुलाखत घेण्यास आले. लोकांचा ईश्वरावरील विश्वास बसण्यासाठी काय करावे लागेल याबद्दल त्यांना साईबाबांची मुलाखत हवी होती. अनेक जणांनी आपल्या अडचणी सोडविण्याची बाबांना विनंती केली. बाबांनी सर्व अडचणी सोडवून दिल्या.

बाबांनी लोकांना उपदेश केला की, "उच्चकोटीच्या आध्यात्मिक तथा परमार्थिक पातळीवर जात-पात, हिंदू-मुसलमान, गरीब-श्रीमंत हे भेद तुच्छ आहेत. त्यामुळे प्रत्येक गोष्टीत असलेल्या परमात्म्यापासून आपण दूरावतो. परमेश्वरावर श्रद्धा ठेवा. निर्मळ मनाने त्याच्याजवळ जा. तो तुम्हाला काहीच कमी करणार नाही." खरोखरीच बाबांचा हा उपदेश श्रेष्ठ आणि मोलाचा आहे.

अपंगशाहीचे पंतप्रधान बाबा आमटेही साईबाबांना भेटावयास आले. त्यांनी आग्रहाने वरोडा येथील महारोगाने पीडित झालेल्या लोकांसाठी काढलेल्या आपल्या 'आनंदवना'त साईबाबांना नेले. तेथे साईबाबांनी महारोगाने हातपाय गळलेले लोक पाहिले व त्यांची मोठी कर्तबगारीही पाहिली. त्यांनी बाबा आमट्यांची पाठ थोपटली. आपल्या मागेही महारोग्यांना साथ देणारे आमट्यांसारखे लोक आहेत हे पाहून त्यांना आनंद झाला. आमट्यांचे त्यांनी कौतुक केले व प्रसन्न होऊन सर्व महारोग्यांना बरे केले.

आपली ६२ वी पुण्यतिथी साजरी होत आहे आणि त्यासाठी शिर्डीच्या संस्थानाने सक्रिय कार्य केले आहे. शैक्षणिक क्षेत्रातसुद्धा आपण प्रवेश केला आहे. विद्यार्थ्यांनी सुद्धा आपल्या नावावरून, कीर्तीवरून पंचप्राण ओवाळले; आपल्या-बद्दल ज्ञान संवर्धनाचा प्रयत्न केला आहे. हे जेव्हा साईबाबांना दिसले तेव्हा तर त्यांना आभाळच ठेंगणे वाटल्यासारखे झाले.

लोकांनी बाबांना विनंती केली, की तुम्ही तुमचा मुक्काम आणखी वाढवा आणि वादळाच्या झंझावातात सापडलेल्या आम्हाला तुम्ही मार्गदर्शन करा. आमची अवस्था सुकाणू नसलेल्या नावेसारखी झालेली आहे. सध्या जगाची राजकीय, आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे. श्रीमंतवर्ग चैन, विलास यात गुंग असून दीनदुबळे लोकांच्या मानगुटीवर मात्र महागाईचे भूत बसले आहे, आणि ते या महागाईच्या चरकात पिळले जात आहेत.

तेव्हा अशा आपदग्रस्त लोकांना समजावून घेऊन त्यांची अवस्था या सर-कारच्या निदर्शनास आणा. राजकीय क्षेत्रातील बंडखोरीस आळा घाला. सध्या या नेत्यांना आपले कोठे चुकते ? हेच कळत नाही; तेव्हा सध्याचे सगळे निरर्थक पक्ष नष्ट करा आणि भारतात एकाच चांगल्या पक्षाचे अस्तित्व निर्माण करा.

बाबा, या भारताची सत्ता एका चांगल्या सूत्रधाराच्या हाती द्या. भारताला सुखी-संपन्न करा. आमच्यासारख्या पामरांना या गर्तेतून वर काढा व नंतरच आपण शक्य झाल्यास, तुमच्या आत्म्याला समाधान वाटल्यास गुप्त व्हा. पण बाबा गुप्त झाल्यानंतरसुद्धा आमच्यावर तुमची स्नेहाची कृपादृष्टी असू द्या.

घार हिंडते आकाशी। चित्त तिचे पिलापाशी ॥ अशीच आमच्या ठिकाणी तुमचे मन असू द्या, व जेव्हा जेव्हा या भारतीयांवर संकटे येतील तेव्हा तेव्हा आपण प्रकट होऊन मार्गदर्शन करीत जा.

बाबा, ऐकाल ना आमचं ? आणखी आम्ही आपल्यासारख्या श्रेष्ठ, पुण्यत्व लोक असलेल्या महात्म्यास काय सांगावे ? बाबा, तुम्ही तर अंतर्ज्ञानी आहातच. पण बालकाला आपल्या आईपुढे आपले हृदय मोकळे केल्याशिवाय कसे राहवेल ? तू आम्हा दीनांची साऊली, तू पाचा तत्वांचा जनिता, सकळ सत्तानायक...

पिंपरीचे साईभक्त श्री. डी. पी. पोतनीस यांचे चिरंजीव राजन यांनी लिहिलेला हा लेख—

# — —० शिरडीचे श्रीसाईबाबा ०— —

—कु. राजन डी. पोतनीस
२६।७ एच. बी. पिंपरी
पुणे-१७.

● जुलै १९८० गुरुपौर्णिमेचा विशेषांक चाळीत असताना खास बालसाहित्य विशेषांक म्हणून यंदा प्रथमच प्रकाशित होत आहे हे वाचून मला सुद्धा श्रीबाबांच्या चरणी काहीतरी सेवा रुजू करावी असे मनातून वाटू लागले. लेखकांसाठी विषय पुष्कळ दिलेत त्यामुळे कोणत्या विषयावर लिहावे हे सुचेना. शनिवारी रात्री झोपलो असता मला एकदम जाग आली माझे घरात चारही बाजूला श्रीबाबांचे फोटो लावलेले आहेत. माझे डोळयासमोर श्रीबाबांचा अशिर्वादाचा फोटो दिसला. बस्स् माझ्या लेखनाचा विषय मला मिळाला "शिरडीचे श्रीसाईबाबा."

आमचे घरी श्रीसाईबाबांची पुजा आरती नियमित होत आहे. वडिल आई जर काही कारणाने बाहेरगावी गेले तर आम्हीच भावंडे श्रीबाबांची पुजा आरती करीत असतो. मला शिर्डीचे साईबाबांची समाधीस्थान पाहण्याची फार इच्छा झाली. माझे हृद्गत् मी माझ्या वडिलांना सांगितले. आमच्या घरची परिस्थिती जेमतेमच आहे. माझे वडिल मला म्हणाले की, तू जर पहिल्या पाच नंबरमध्ये परीक्षेत पास झालास तर शिरडीला नेईन. असा हा मोठा डोंगर माझ्यापुढे उभा केल्यामुळे मी हा विचार सोडून दिला. मनातून बाबांची प्रार्थना करीत होतो की बाबा माझी इच्छा पुरी करा. दर गुरुवारी आरती प्रसाद घेताना विनवीत होतो. अन् जादूची कांडी फिरल्याप्रमाणे माझे लाड बाबांनीच पुरविले. माझा सहावीच्या परीक्षेत तिसरा नंबर आला आणि मी ७ मे १९७६ साली प्रथमच श्रीक्षेत्र शिरडी येथे गेलो. मंदिरात प्रवेश करताच तेथील प्रसन्न वातावरण, दरवळलेला सुगंध, अन् बाबांची सिंहासनावर बसलेली मूर्ती पाहून मला गहिवरून आले. समाधिची पायरी चढताच थंडीच्या दिवसात गार पाण्याचा शिडकावा झाल्याप्रमाणे अंग शहारून निघाले. बाबा खरच गरिबांचे वाली बाबा प्रेमाने सर्वांचे अंगावरून हात फिरवून आशिर्वाद देतात. त्यांच्या समाधिची पायरी जो चढतो त्याची सर्व दुःख पार पळून जातात. हे सत्य तेथेच पटते भक्त आपली सर्व दुःखे विसरून जातो अन् बाबांचा होतो.

द्वारकामाईत धुनी समोरची प्रतिमा, अन् बाबांची दगडी सिंहासनावर ठेवलेली प्रतिमा पाहून बाबा तेथेच आहेत असे वाटते. धुनीमधून निघणाऱ्या ज्वाला भक्तांना सांगतात की, तुमची सर्व दुःख मी माझ्या पोटात घेत आहे आणि त्या दुःखाची रक्षा तुम्ही आपल्या भाळी लावलीत की तुमची विघ्न बारा वाटेने जातात. बाबा जात्यावर दळण दळीत असत याचा अर्थच असा आहे की, सर्व रोगांचे पीठ करून शिरडीच्या शिवेवर टाकण्यासाठीच.

चावडीत गेल्याबरोबर बाबांचा झोपाळा, दोन चाकाची खुर्ची पाहातानाच वाटले की, बाबा राजयोगी असून सुद्धा फकीर झाले ते केवळ सुख दुःख ही ऊन पावसाप्रमाणेच आहेत हे भक्तांना दाखवून देण्यासाठी.

त्यांचे भक्तांना आलेले अनुभव मी नेहमीच श्रीसाईलीलातून वाचत असतो अन् मनात विचार येतो की, बाबा भक्तांची कामना पुरी करतात ते फक्त श्रद्धा व सबुरी यामुळेच दुसरे काही कारण नाही.

श्रीसाईबाबांचे प्रतिमेकडे आपण एकटक लावून बसलो म्हणजे बाबांचे डोळे आपल्याशी गुपीत काहीतरी सांगत आहेत असे वाटते.

“ माझा जो जाहला काया वाचा मनी,
तयाचा मी ऋणी सर्वकाळ ”

हे सत्य पटते.

मला जर कोणी विचारले की श्रीसाईबाबांचे ठिकाणीच तुझी श्रद्धा का ? तर मी सांगेण की, आमच्या घराची ही कुलस्वामिनी आहे. ‘ सबका मालिक एक ’

व्यक्तीने चमत्काराला भुलण्यापेक्षा प्रत्यक्ष अनुभव आल्यानंतरच आपला देव अन्तरी ठेवावा. त्यांची पुजा देखाव्याची करू नये. नेत्रांच्या डोहातील पाण्याने शुद्ध मंगल स्नान घालावे, मनातूनच गंध-अक्षता फल पुष्प वाहिले तरी चालते. काया, वाचा, मने आपण त्याचेच व्हावे मग कोणतीच गोष्ट अवघड नसते. यश हमखास पुढे उभे राहते हा माझा तरी स्वतःचा अनुभव आहे. बाबांचा आशिर्वाद म्हणूनच मी दरवर्षी पास होऊन यंदा मार्च ८० मध्ये एस. एस. सी. दहावी उत्तीर्ण झालो आहे. स्वच्छ जागेवर बसून शांतचित्ताने त्यांचेच आपण व्हावे प्रार्थना करावी आजूबाजूला काय चालले आहे हे सुद्धा आपल्याला कळू नये म्हणजेच आपण श्रीसाईबाबांचे झालो असे मला वाटते.

मी त्यांचे चरणी प्रार्थना करतो की, मला दरवर्षी परीक्षेत सुयश देऊन माझ्या माता-पिता यांना सुखी ठेवा.

# साई माझा देव

★★★ ★★★ ★★★

—कु. आशिष विजय हजारे
सी।६, गुंफादर्शन, फर्स्ट कार्टर रोड
बोरीवली-पूर्व मुंबई ६६

[साईभक्त कवी श्री. विजय हजारे यांचा हा साईभक्त पुत्र अवघा १२ वर्षाचा असून तो बोरीवलीच्या हेमराज हायस्कूलमध्ये ८ वीचा अभ्यास इंग्रजी माध्यमातून करीत आहे.]

---

● जगात खूप धर्म आहेत, प्रत्येक धर्माप्रमाणे त्या त्या लोकांचे देव वेगवेगळे आहेत. अर्थात् त्यांची नावे वेगवेगळी आहेत. पण सर्व जग निर्माण करणारा परमेश्वर हा एकच आहे. त्याची रूपे वेगळी, नावे वेगळी ! पण माझा देव मात्र एकच आहे. तो म्हणजे 'सबका मालिक एक' असे आपल्या भक्तांना सांगणारा "साई देव." आमच्या भाईंची (माझ्या वडिलांची) शिकवण तशी म्हणून म्हणा किंवा दुसरं काही म्हणा.

पण कुणी मला कधी विचारले की—

"आशू, तुझा देव कोणता ?"

प्रथम मला काही समजले नाही म्हणून मी विचारले,

"म्हणजे...तू काय म्हणतोस"

"अरे, म्हणजे तू कुठल्या देवाला मानतोस" मग मात्र माझी ट्युब पेटते आणि......

"साईबाबा" मी पटकन सांगून टाकतो.

"कारण काय रे ?"

"कारण तसं सांगता येत नाही"

"पण मानतो हे खरं......जन्मापासून"

"कधी शिर्डीला गेला आहेस"

"वा ! नेहमीच जातो की......माझ्या वडिलांबरोबर"

"म्हणून त्यांना मानतोस"

मी फक्त मान हालवितो.

"साई-बाबा" मला देव वाटतात कारण ते भक्तांच्या हाकेला धावतात. बाबांना "शिर्डीचे संत" म्हणतात. "मुलांचे साईबाबा" हे पुस्तक मला खूप आवडते. साईबाबांच्या गोष्टी वाचून, ऐकून ते देव होते, ह्याची खात्री पटते देवाचा अवतार आहेत याचा इतराप्रमाणे मला अनुभव येतो.

" रामाचे नाव घ्यावे म्हणजे काळोखाची भिती वाटत नाही " असे आजी सांगते.

मी " साई–बाबांचे नाव घेतो, अजिबात भिती वाटत नाही. मग साईबाबा म्हणजे " श्री रामच भासतात ते मला पावतात. आमच्या घरात फक्त माझ्या साईदेवाचीच तसबिर आहे. त्यांना मनापासून नमस्कार केला की ते हसून आशिर्वाद देतात असा भास होतो.

मी स्विमींगबाथला, ट्रीपला किंवा शाळेत जाताना बाबांची 'उदी' लावतो म्हणून सुखरूप जातो येतो. कधी तब्बेत बिघडली आणि उदी लावली तर खरोखर बरे वाटायला लागते. परिक्षेची भिती बाबांचे नाव घेताच पळते. वाचलेले आठवते. पेपर सोपे जातात. अभ्यास केल्याचे चीज होते. मला नेहमीच शिर्डीला जावेसे वाटते कारण तेथे माझ्या देवाचा दरबार आहे ना. ?

मी रंगात आलो की सिनेमाच्या गाण्याच्या चालीवर माझ्या साई देवाला हाक मारतो ती बाबांना आवडते. म्हणूनच ती "साईलीला" मध्ये छापून येते.

" वो शिर्डी के महात्मा
माँ–बाप तुम हो मेरे
आशिष हूँ मैं जो तेरा
शिर्डी मुझे बुलाले,,

माझा देव माझी प्रार्थना ऐकतो, आणि मला वडिलांसह शिर्डीला जाण्याचे भाग्य लाभते.

देव म्हणजे तरी काय? एक शक्ती ज्या पुढे आपण नमतो, लवतो ती. त्यांची आरती म्हणताना ते माझ्याकडे बघतात आणि म्हणतात––

" Why Fear when I am Here. "

असे मला नेहमी वाटते कारण साई माझा देव आहे. त्यांचे नाव सदैव माझ्या जिभेवर राहू दे, अशी मी माझ्या साई देवाजवळ प्रार्थना करतो.

--------------

# बाबांची अगाध लीला

—कु. विकास वखारे
१२/२१२ बी. पी. टी. स्टाफ कॉलनी
रेनॉल्डस रोड, आझादनगर समोर
वडाळा मुंबई ४०००३७

[बी. पी. टी. मध्ये नोकरीस असलेले साईभक्त श्री. मधुकर वखारे यांचा विकास हा मुलगा, ज्ञानेश्वर विद्यालयात तो सध्या ८ वीत शिक्षण घेत असून वाचनाची त्याला आवड आहे.]

---

● आमच्या घरी श्री साईबाबांची पूजाअर्चा नियमीत चालू असते. श्रीसाईबाबांवर आमचा पूर्ण विश्वास आहे. श्रीबाबांच्या कृपेने आम्ही समाधानी व सुखी आहोत. गेल्यावर्षी मे महिन्यात आम्ही सर्व घरातील मंडळी श्री क्षेत्र शिरडीला सौ. आजीसह गेलो होतो. शिरडीक्षेत्र मला फार फार आवडले. गुरुस्थानातच आम्ही उतरलो होतो. तेथील पवित्र वातावरणात आम्ही ३ दिवस राहिलो. आमच्या आजीला तर शिरडीक्षेत्र फारच आवडले सर्वांनी श्री बाबांना अभिषेक केला. गुरूवारची पालखी बघीतली. श्री बाबांच्या समाधी मंदिरातून चावडीपर्यंत आम्ही पालखी बरोबर गेलो. फारच आनंदी सोहळा होता तो. गर्दीपण खूपच होती. पहाटे उठल्यावर सनई वादनाने व सुंदर भक्तीगीताने वातावरण इतके भक्तीमय असायचे आणि असे वाटायचे की सदैव इथेच राहावे. बाबांच्या भक्तीमय वातावरणात व गुरूस्थानातील मुक्कामात तीन दिवस कसे निघून गेले ते कळलेच नाही. शिरडीहून परत येताना आम्ही नाशिकला मुक्तिधामातील निवासस्थानात एक दिवस रात्र मुक्काम केला. मुक्तिधाम बघितले. माझा धाकटा भाऊ तेव्हा अडीच वर्षांचा होता. त्याला शिरडीला व प्रवासात चांगले दूध मिळाले नाही म्हणून त्याने ३।४ दिवस नाशिकला येईपर्यंत अजिबात दूध घेतले नाही. थोडाफार भात तो खायचा. पण घरी तो नुसत्या दूधावरच असायचा. माझ्या आई बाबांना त्याची काळजी वाटायला लागली व आम्हालाही त्याच्या प्रकृतीमुळे घरी लवकर जायची घाई झाली. पण आमच्याकडे परतीचे तिकीट नव्हते. ( रिझर्व्हेशन ) गाडयांना तर खूपच गर्दी. आई-वडील काळजीत पडले. तशातच म्हातारपणामुळे आजीची प्रकृतीपण बिघडली. आजींना आम्ही बाबांची उदी पाण्यातून दिली. बाबांचे नामस्मरण ती करीतच होती. तिला बरे वाटायला लागले. नाशिकहून आम्हाला वणी येथे सप्त-

शृंगी देवीच्या दर्शनाला गडावर जायचे होते पण चि. राघवेंद्रला व आजीला बरे वाटत नसल्याने आम्ही तो बेत रद्द केला. पण मुक्तीधामातील मुक्कामात एक गंमत झाली. माझा धाकटा भाऊ चि. राघवेंद्र म्हणाला आई ग, रात्री माझ्या पलंगाजवळ श्री बाबा दिसले. आम्ही उत्सुकतेने त्याला विचारले की बाबा तुला काय म्हणाले ते सांग तर तो म्हणाला की, "बाळा दूध पी" असे बाबा मला म्हणाले. लगेच माझ्या वडीलांनी दूध आणले आणि तो ४ दिवसात प्रथमच दूध प्याला. बाबांनी माझ्या धाकट्या भावाला स्वप्नात येवून दूध पिण्यास सांगितले. त्याचे ते बोबडे बोल ऐकून आम्हास किती आनंद झाला म्हणून सांगू! संध्याकाळी मुंबईला परतण्यासाठी आम्ही नाशिक सिटी बसडेपोवर आलो. पण तिथून मुंबईला जाणाऱ्या सर्व एस. टी गाडयांचे रिझर्व्हेशन संपूर्ण भरले होते. आमच्या डोळयादेखत एक एस. टी. खचून भरलेली मुंबईकडे जाताना बघीतली. आम्ही लहान तीन भावंडे, आजी आई वडील असे ६ जण अशा गर्दीतून जाणे अगदीच अशक्य होतो आम्ही एस. टी. स्टॅंडवरच रात्रभर थांबायचे ठरवले. परंतु रात्री ८॥–९ च्या सुमारास एक एस. टी. ४-५ माणसांसह येताना दिसली ती रिकामी असल्याने आम्हाल. वाटले ती याच डेपोत थांबण्यासाठी आली असेल. पण सहज चौकशी करता ती मुंबईला जाणार असल्याचे कंडक्टरने सांगितले. आम्हाला पुन्हा आश्चर्याचा धक्का बसला. आम्ही सर्वजण गाडीत बसलो. अगदी आरामात झोपून मुंबईला पहाटे सुखरूप आलो. मुंबईपर्यंत त्या एस. टीत फक्त १०-१२ प्रवासी होते. जणू आमच्यासाठीच श्रीबाबांनीं ती रिकामी गाडी पाठवली होती. ही सर्व किमया बाबांचीच याची आम्हाला खात्री पटली. भक्तांच्या मदतीला सदैव धावून जाणारे बाबा आम्हाला सदोदित मदत करीत होते. चार दिवसांच्या या दोन घटनांमुळे आमची बाबांवरील श्रद्धा आणखीनच दृढ झाली. बाबांचा अवतार भक्तांच्या संरक्षणासाठी. त्यांच्या मदतीसाठी, उत्कर्षासाठी व उद्धारासाठी आहे हे निःसंशय खरे आहे. फक्त त्यांच्या ठायी दृढ श्रद्धा हवी. दररोज मी बाबांचा अनंत कोटी ब्रह्माण्डनायक योगिराज महाराजाधिराज श्री सच्चिदानंद सद्‌गुरु साईनाथ महाराजकी जय असा जयजयकार करतो व म्हणतो.

ज्या ज्या ठिकाणी हे मन जाय माझे  
त्या त्या स्थळी साई स्वरूप तुझे  
मी मस्तक ठेवितो ज्या ठिकाणी  
तेथे तुझे सद्‌गुरू पाय दोन्ही ॥

▲

पुण्याचे साईभक्त कुटुंब सौ. व श्री. सूर्यकांत गर्जे यांच्या १४ वर्षाच्या कन्येने लिहिलेला हा लेख

# माझे श्री साईबाबा

—कु. सुषमा सू. गर्जे
८० शिवाजीनगर पुणे ५

* श्रीसाईबाबांच्या नावातच मोठी किमया आहे. स + आई + बाबा म्हणजेच आपले साईबाबा आईची माया देतात आणि वडिलांचे प्रेम देतात. साईबाबांना मुले फार प्रिय असत. मुलांच्यात ते रमून जात. मला तर असे वाटते की, बाबांनीच कदाचित श्रीसंपादक महाशयांना सुचवले असावे की, माझ्या आवडत्या मुलांकडून त्यांच्या मोडक्या तोडक्या भाषेत लेख मागवावेत.

श्री साईबाबा आपल्या पुण्य भारतभूमीवरील 'शिर्डी' गावी अवतरलेले एक महान संत आहेत. परंतु माझ्या मते साईबाबा आपल्या सर्वांचे बाबा आहेत. ज्या प्रमाणे आपले बाबा आपल्याला चांगल्या सवयी शिकवतात, चांगले कृत्य केल्यावर आपल्याला चांगला प्रसाद देतात, आपले काही चुकले तर आपणास मार्गदर्शन करतात त्याचप्रमाणे साईबाबा पण आपली काळजी घेतात. आपले साईबाबा खूप उदार आहेत. त्यांचे हृदय सागरासारखे विशाल आहे. आपल्या सर्व इच्छा ते पूर्ण करतात. आपल्याला आकाशातील चांदणी जरी हवी असेल तर ती सुद्धा बाबा आपल्याला देतील. साईबाबांच म्हणणंच आहे. "जर तुम्ही श्रद्धा आणि सबुरी या दोन गोष्टींचे पालन कराल तर मी तुमच्या कामना नक्कीच पूर्ण करीन."

साईबाबांच्या या वाक्याचे पालन मी नेहमीच करते. साईबाबा माझ्या सर्व इच्छा पूर्ण करतात. एखादी छोटीशी वस्तु जरी हरवली असेल तर मी साईचे स्मरण करते. कारण मला माहित आहे की, बाबा शिवाय दुसरे कोणीच ती वस्तू सापडून देणार नाही. परिक्षा असो किंवा चाचणी, साईबाबांचे नाव घेऊन सोडवलेल्या पेपर मध्ये उत्तम गूण मिळतातच. सर्दी असो, खोकला असो किवा ताप. साईबाबांची उदी नुसती कपाळाला लाऊन थोडीशी तोंडात टाकली की कुठलाही रोग बरा होतोच.

एकदा माझ्या आईची तब्येत बरी नव्हती. तरी आई चपात्या करावयास बसली अशक्तपणामुळे आईला एकदम चक्कर व डोळयासमोर अंधेरी आल्यासारखी वाटली.

मी पळत जाऊन बाबांची उदी आणली. बाबांना मनापासून स्मरून ती उदी आईला दिली. आणि काय आश्चर्य ! आईला त्याचक्षणी बरे वाटू लागले.

संधी मिळताच मी आई-वडिलांच्या बरोबर शिर्डीला श्रीसाईबाबांच्या दर्शनास जात असते. समाधी मंदिरात बाबांच्या पुढे उभे राहिल्या नंतर असे वाटते जणू बाबा माझ्याशी बोलत आहेत, हसत आहेत आणि हळूवार पणे मायेने हात फिरवित आहेत.

साईबाबा कुठल्या जातीचे होते किंवा त्यांचा जन्म कुठे व केव्हा झाला हे कोणालाही माहित नाही. त्यांच्या पायाकडे कुबेराचे धन लोळत असतानाही त्यांची राहणी अगदी साधी–सुधी आहे. शिर्डी सारख्या छोट्या गावात ते राहत पण त्यांनी त्याच गावाला स्वर्गात रूपांतर केले आहे. ज्या प्रमाणे बागेतल्या गुलाबाकडे भुंगे आपणहून आकर्षित होतात, त्याच प्रमाणे शिर्डीतल्या साईबाबांकडे सर्वजण आपो-आप नतमस्तक होतात.

साईलीला अगाध आहे. बाबांचा महिमा वर्णावा तितका थोडाच. अशा दैवताला माझा साष्टांग नमस्कार.

---

## साईबाबा माझी माऊली

साईबाबा माझी माऊली
साईबाबा माझी साऊली ।। धृ० ।।
संकट येता धाऊनि येती
निज–भक्तांचे रक्षण करिती ।। १ ।।
आठवण येता तुमची चित्ती
पावन करिती ब्रह्मानंदी ।। २ ।।
तव लीलेचा महासागर
मार्ग दाविती महा–अपार ।। ३ ।।
तुमच्या रुपाचे प्रेमळ दर्शन
सगुण भक्तीचे रूप मनोहर ।। ४ ।।
तुम्हा गुणांची करिता कीर्तने
शब्द–स्वरांची होती सुमने ।। ५ ।।
धन्य होई हो अवघे जीवन
तुझ्या स्मृतीनी उजळुनि क्षण क्षण ।। ६ ।।

—श्री. प्र. गो. कोळमकर, बी. ए. बी. एड. एल. एल. बी.
१९ क, गुंफादर्शन, दत्तवाडा, बोरिवली पूर्व, मुंबई ६६

# साईबाबा अवतरले तर

—कुमार संदिप बाबूराव नाईकवडी
अगस्ती विद्यालय, अकोले

● भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितले आहे. 'हे अर्जुना या पृथ्वीतलावर जेव्हा जेव्हा अधर्म व अन्याय माजले, त्या, त्या, वेळी दुष्टांचा नाश करण्यासाठी व सज्जनांचे रक्षण करण्यासाठी या पृथ्वीवर मी पुन्हा अवतार घेईन.'

परित्राणाय च साधुनां
विनाशाय च दुष्कृताम्
धर्म संस्थापनार्थाय
संभवामी युगे, युगे ।

खरोखर आजही मला आठवण येते ती भगवान श्रीकृष्णांच्या या वचनाची. आमचा भारत देश महान आहे त्याच्या सांस्कृतिक परंपरा अतिशय महान आहेत. या देशात जनतेच्या मनाच्या सिंहासनावर राज्य करणारे हजारो धर्मात्मे होऊन गेले आहेत.

भारतातील साधुपुरुष हे खऱ्या अर्थाने समाजाचे आधारस्तंभ होते. प्राचीन काळातील ऋषीमुनींपासून तो आजपर्यंतच्या अगदी गाडगे बाबांपर्यंत ही मालिका सतत चालू आहे आणि या साधुपरंपरेने आपल्या तेजाने आपल्या अलौकिक कर्तृत्वाने चमकलेले 'साईबाबा' हे एक अमोल रत्नच आहे.

खरोखर या जगात काही माणसे जन्माला येतात ती केवळ स्वतःसाठी नव्हे तर त्यांचा जन्म दुसऱ्यासाठीच असतो. साईबाबांचे संपूर्ण जीवन जर आपण अभ्यासले तर ही गोष्ट आपणास सहजच लक्षात येते. ज्याला स्वतःचा भूतकाळ माहित नाही असा एक कोणी अवलिया या शिर्डी नावाच्या गावी येतो काय ! आणि निरनिराळे चमत्कार करून आणि तेथील ग्रामस्थांची सेवा करून स्वतः अजरामर होतो काय ! आज खरोखरच मला भगवान श्रीकृष्णाच्या त्या सुप्रसिद्ध वचनाची आठवण होते आहे.

" धर्म संस्थापनार्थाय संभवामी युगे, युगे. "

आज खरोखर या अज्ञान अंधः–कारात खितपत पडलेल्या, भ्रष्टाचार हेच ज्याच्या जीवनाचे ध्येय आहे अशा या समाजाला खऱ्या अर्थाने तारुन नेण्यासाठी एखादा ' साईबाबा ' हवा आहे.

आज साईबाबांचे अवतार समजले जाणारे ' सत्यसाईबाबा ' या पृथ्वीतलावर अवतीर्ण आहेत. त्यांचा आणि माझा काहीही संबंध नाही. परंतु साईबाबा सारखे ते गरीबांच्यासाठी काम करताना दिसत नाहीत असेच माझ्या बालबुद्धीला वाटते. आज खरोखर साईबाबा या समाजात हवे आहेत. म्हणजेच आज ते असणे ही खऱ्या अर्थाने सामाजिक गरज होऊन बसली आहे.

साईबाबा पुन्हा अवतरले तर ते खऱ्या अर्थाने या बिघडलेल्या जनतेची आणि हालअपेष्टा सोसणाऱ्या जनतेची व काबाडकष्ट करून देखील पोटास अन्न मिळायला महाग झालेल्या जनतेची स्थिती निश्चितच सुधारतील ! कारण त्यांच्या अंगी तसे सामर्थ्य हे निश्चितच आहे आणि म्हणून ते आज हवे आहेत.

समाज हा खऱ्या अर्थाने अशा लोकांची डोळ्यात प्राण आणून वाट पहात असतो कारण समाजाचा खऱ्या अर्थाने ' आत्मा ' तो महापुरुष असतो.

आज साईबाबांच्या नावावर अनेक फंड, ट्रस्ट, धर्मादाय संस्था निर्माण झालेल्या आहेत. परंतु समाजाला या गोष्टींचा काहीसुद्धा उपयोग नाही. जोपर्यंत या समाजातील गरीब लोकांना पोटास पोटभर भाकरी मिळत नाही तोपर्यंत या अशा संस्थांचा काय उपयोग ! वरवर मलम पट्ट्या करीत बसणाऱ्या या संस्था आहेत.

साईबाबा खरोखरच जर पुन्हा अवतरले तर मात्र ते खऱ्या अर्थाने गरीबांसाठी कार्य करतील. समाजाला नवीन दिशा देतील. या संस्था गरीबांचे शोषण करणाऱ्या आहेत आणि मानवतावादी विचार असणाऱ्या साईबाबांना ही गोष्ट कधीच सहन होणार नाही.

म्हणजेच साईबाबा अवतरले तर जीवन खऱ्या अर्थाने सुधारून जाईल. आज अशी स्थिती आहे की ज्याला कोणतेही ज्ञान नाही असा माणूस आज साधू होतो, व समाजाला फसवतो आहे व समाजाची किती अधोगती होते आहे. तेव्हा साईबाबा अवतरले तर अशा या भोंदू व सामाजिक प्रगतीच्या आड येणाऱ्या साधूंना खऱ्या अर्थाने प्रतिबंध होईल. लोकांनाही त्यांचे स्वरुप सत्य आहे हे समजेल व ते खऱ्या अर्थाने आध्यात्मिक होतील.

साईबाबा अवतरले तर गरीबांचा फायदा हा जास्तीत जास्त होईल कारण गरीबांसाठीच साईबाबांचे जीवन होते त्यांनी चमत्कार केले पण त्या चमत्कारांचे भांडवल केले नाही. तर ते त्यांनी गरीबांच्या व समाजाच्या हितासाठीच वापरले. म्हणून समाजाची खऱ्या अर्थाने प्रगती करण्यासाठी समाजाचा उद्धार करण्यासाठी, गरीबांचे कल्याण करण्यासाठी, धार्मिक क्षेत्रातील भ्रष्टाचार दूर करण्यासाठी साईबाबा आज पुन्हा या पृथ्वीतलावर अवतरावयास पाहिजेत.

आणि मला वारंवार भगवान श्रीकृष्णाच्या वचनाचा महिमा आठवतो आणि खरोखरच—

'तो' दिवस फारसा दूर नाही !

☆ ☆ ☆


श्रीसाईलीला येत घरा तोचि दिवाळी दसरा

**श्रीसाईलीला**

साईभक्तांच्या सुमारे शंभरावर विविध अनुभवांनी भरगच्च असा छानदार, संग्राह्य अंक शिवाय

**सद्‌गुरु नाना महाराज तराणेकर यांचे जीवनदर्शन**

या अंकात कविता अजिबात प्रसिद्ध केल्या जाणार नाहीत.

पृष्ठे १२८] [मूल्य २ रु.

मुखपृष्ठावर श्रीबाबांचे बहुरंगी फ्रेम करण्यालायक चित्र

# मी शिर्डीची वारी करतो

कु. संजय ज. बारगळ
श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, शिरडी

● भारत देशाला संताची भूमी म्हटले जाते. भारतामध्ये अनेक संतश्रेष्ठ होऊन गेले. त्यांच्यापैकीच एक म्हणजे श्री सच्चिदानंद साईनाथ महाराज होते. संत शिरोमणी साईबाबांच्या वास्तव्यामुळे पुनित झालेले शिर्डी हे एक छोटेसे गाव आहे. कोपरगाव तालुक्या पासून सुमारे १८ कि. मी. अंतरावर वसलेले हे खेडे साईबाबांचे लीलानाट्य व अवतारसमाप्ती येथेच झाल्यामुळे शिरडीला तिर्थक्षेत्राचे स्वरूप आले आहे. नव्हे-नव्हे ते नाशिक पंढरपूर या सारखे एक तिर्थक्षेत्रच बनले आहे.

मी साईबाबांची महती ऐकून होतो. साईबाबा भक्तांचे मनोरथ पूर्ण करतात हे ही ऐकून होतो. साईबाबा नेहमी म्हणत "तुम्ही माझ्याकडे एक पाऊल आलात तर मी तुमच्याकडे दहा पावले येईन." म्हणून एका रामनवमीच्या उत्सवाला मी शिर्डीला आलो.

शिर्डी बसस्थानकावर उतरताक्षणीच आमच्याकडे दोन-चार तरुण मुलांचा घोळका आला. व "चला तुम्हाला हार-प्रसाद घेऊन देतो, असे म्हणू लागला. परंतु माझ्या वडिलांनी त्यांना स्पष्ट नकार दिला. आम्ही स्टँड बाहेर पडलो. ती मुले म्हणजेच येथील हारांच्या दुकानदारांची माणसे होती. हे दुकानदार या मुलांना त्यांच्या मालाच्या विक्रीवर कमिशन देतात. अशा कित्येक मुलांचा उदरनिर्वाह होतो. हे आम्हास नंतर कळाले.

बस स्थानकाजवळ आम्हाला 'श्री खंडोबाचे मंदिर' दिसले. याच मंदिरात १८५४ साली चांदभाई पाटलाच्या भाच्याच्या (औरंगाबाद जिल्हा धूप या खेड्यातील) वरातीबरोबर या संतश्रेष्ठाचे आगमन झाले, व या मंदिरातील खंडेरायाचे निस्सीम भक्त म्हाळसापती, यांनी आओ साई म्हणून त्यांचा आदरसत्कार केला व तेव्हा पासून या संत श्रेष्ठाचे नाव साईबाबा हेच राहिले.

मंदिराच्या लगतच साईबाबांच्या कृपेने व साईसंस्थानच्या सहकार्याने चालविले जात असलेले सर्व अत्याधुनिक उपकरणांनी सज्ज असे हॉस्पीटल.

ज्यांच्यासाठी साईबाबांनी आपला संपूर्ण अवतार खर्ची घातला. त्या गोरगरिबां-साठी अपंगासाठी चालविलेला हा दवाखाना येथे जेवणा-खाण्याचीही फुकट सोय आहे.

हॉस्पिटलच्या अगदी जवळ असलेले 'श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय' येथे येणाऱ्या गोरगरीबांच्या मुलांच्या शिक्षणाची व जेवणाची फुकट सोय 'साई-संस्थान' करते. असे हे सुसज्ज इमारत असलेले विद्यालय.

साईबाबांच्या मंदिराच्या जवळपास दुतर्फा हारांची व प्रसादाची दुकाने. तसेच साईबाबांच्या मूर्ति, लॉकेट, फ्रेम इ. खच्चून भरलेली दुकाने. हार व प्रसाद घेऊन मी समाधी मंदिरात प्रवेश केला. मंदिरातील स्वच्छता पाहून मनाला खूप प्रसन्न वाटले. तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी जी दिसणे अशक्य असते, ती स्वच्छता व शिस्त पाहून मन समाधानी झाले. श्री साईबाबांची धवल संगमरवरी दगडाची मूर्ति आणि तिचा थाट-माट पाहून मन भुलून गेले. येथील एकंदर थाटच आगळा बाबांना वैभवात राहावयास आवडे असे म्हणतात, की साईबाबा म्हणत 'आज माझ्या अंगावर फाटका-पुराना अंगरखा असला, तरी एक-वेळ अशी येईल की माझे पाच-पाच मिनिटांनी अंगरखे बदलले जातील. बाबांना रोषणाईची अत्यंत आवड होती.

समाधीच्या चारही बाजूस चांदीचा नक्षीदार कठडा, चांदीच्याच नक्षीदार मंचकावर साईनाथ विराजमान झालेले आहेत. मंचकाच्या दोन्ही बाजूस चांदीचे दोन सिंह, मस्तकावर चांदीची छत्री, पाठीमागे चांदीची महिरप आणि त्यात विजेचे छोटे दिवे. पाच–पाच मिनीटाच्या अंतराने बदलल्या जाणाऱ्या सुंदर–सुंदर रंगाच्या, जरी भरीचे काम केलेल्या मोहक नक्षीच्या शाली, डोक्याला बांधलेल्या केशरी रंगाचा रुमाल साईंच्या मूर्तिकडे पाहिल्या नंतर असे वाटते की येथून हलूच नये. सुगंधी अत्तरे आणि फुलांच्या सुवासाने धुंद झालेले वातावरण यामुळे भान हरपून चातक पक्ष्याप्रमाणे भक्तगण बाबांच्या मुखकमलाकडे टक लाऊन बघतच राहतात. हे दृश्य पाहिल्यानंतर येथे देवाचा वास आहे, याची खात्री होते. येथे काम करणारे सर्व भटजी पगारी नोकर आहेत. त्यामुळे येथे भक्तांना लुबाडणे नाही. बाबा हयात असताना नेहमी म्हणत "मेरा जो खायेगा वह मेरे जैसा फकिर होगा!"

मंदिर आरशासारखे स्वच्छ ठेवण्याचे काम कामगार लोक वेळेचे भान न ठेवता करतात. येथे येणाऱ्या भक्तांची संस्थान तर्फे अत्यंत उत्तम आणि स्वस्त दरात सर्व सोय केलेली आहे.

समाधी मंदिराच्या पूर्वेला द्वारकामाई मशीद आहे. येथे साईबाबा एक दिवसाआड झोपत व भक्तांना उपदेश करीत. याच ठिकाणी बाबांनी प्रज्वलित केलेली धुनी अद्याप आहे. बाबा ज्या शिलाखंडावर बसत तो शिलाखंड येथेच आहे. येथे बाबा वापरत असलेल्या वस्तू ठेवलेल्या आहेत.

दर गुरुवारी बाबांच्या पालखीची वाजत-गाजत शाही इतमामाने मिरवणूक निघते व ती चावडीत येते. याच चावडीत बाबांच्या मोठ्या फोटोची रोज पूजा-अर्चा होते.

समाधी मंदिर, द्वारकामाई व चावडी या तिन्ही ठिकाणी भक्तांसाठी बाबांची उदी ठेवलेली असते. समाधी मंदिरामध्ये दररोज ४ वेळा श्री साईनाथांची पेटी तबल्याच्या तालावर हुजऱ्यांच्या सलामीत, असंख्य भक्तांच्या साक्षीने आरती होते.

मंदिराच्या उत्तरेला 'गुरुस्थान' आहे. येथे असलेल्या लिंब वृक्षाची पाने गोड आहेत. येथून थोड्याच अंतरावर संगमरवरी दगडाच्या राजहंसाच्या चोचीतून कारंजे उडत आहे. तेथून जवळच बाबांच्या आवडत्या भक्तांच्या समाध्या आहेत. या समाध्याना लागूनच 'प्रधान लेंडीबाग' आहे. या ठिकाणी येऊन बाबा एकांतात चिंतन करीत.

आज भारताच्या कोनाकोपऱ्यातून लाखो लोक शिर्डीकडे का धाव घेतात ? याचे रहस्य मला आज उलगडले. शिर्डी हे नगर जिल्ह्यातील पंढरपूर आहे असे मला वाटते.

१ शिर्डी माझे पंढरपूर, येथे नांदतो साईश्वर !

२ शिर्डी वाले साईबाबा

आया हूँ तेरे दरपे सँवारी । असे गुणगुणत मी परत फिरलो.

"श्री सच्चिदानंद साईबाबा की जय !"

# अनोखी संध्याकाळ

—कुमारी प्रतिभा बळीराम पराडकर
जुनी बी. डी. डी. चाळ नं. ४ रु. नं. ८
एस. एस. वाघ मार्ग, नायगाव
मुंबई नं. १४ (दादर

शाळेतून घरी आल्यानंतर थोडा वेळ खेळून नंतर अभ्यासाला बसणे हा माझा नित्य नियम असे. आमच्या घरी माझे वडील राम भक्त होते. ते रोज ' राम राम' हे शब्द लिहून काढीत आणि माझे मामा हे श्री साईबाबांचे भक्त होते. त्या दिवशी संध्याकाळी ते बाबांच्या दर्शनाला जाण्यापूर्वी आमच्या कडे आले, आणि त्याच्या पाठोपाठ मी आली. मनात कोणते विचार नसताना त्यांनी चटकन् मला विचारले " बेबी बाबांकडे जायचे आहे, तू येतेस का? का कोणास ठावूक परंतु मी मात्र हसून त्यांना थट्टेतच विचारले, " अहो ते तुमचे बाबा हिंदू आहेत की मुसलमान? कारण मी माझ्या बाल बुद्धी प्रमाणे कुठेतरी असेच वाचले होते.

परंतु हा प्रश्न ऐकून मामा मात्र काहीच बोलले नाहीत. त्या नंतर ते आणखी एक महिन्यानी आमच्याकडे आले, व मी स्वतःच त्यांना म्हणाली की मी आज तुमच्या बाबांच्या दर्शनाला येते. ते फारच खुष झाले.

ते एक घरवजा मंदिर होते. त्यात बरीच भक्त मंडळी बसली होती. तेथे आम्ही प्रवेश केला, मामांनी त्यावेळी गुरू घेतले होते, त्यांना त्यांनी नमस्कार केला व मलाही करण्यास सांगितले.

त्यानंतर मात्र श्री साईबाबांनी फार मोठा चमत्कार दाखविला व ते गुरुद्वारे सांगू लागले, की " बेटी, मी कफनी बांधतो म्हणून मुसलमान दिसतो, व कान टोचले आहेत म्हणून मी हिंदू आहे. " हे शब्द ऐकून माझे शंकासमाधान झाले, व मला फारच आनंद झाला.

मात्र त्यावेळी माझ्या मनात दुसरीच शंका निर्माण झाली. ती अशी की हे शब्द मी घरी बोलले व मामानीही कोणाला सांगितले नसताना ते बाबांना कसे

समजले. खरोखर बाबा अंतर्यामी आहेत ते मला त्यावेळी समजले. श्रीसाईबाबांचे अस्तित्व सगळीकडे आहे हे मला माहित झाले. त्यांनी मला दाखवून दिले.

त्यानंतर माझे मन फार आनंदित झाले व वाटले, "अहा, हा; काय ती श्री साईबाबांची अगाध लीला" त्या वेळेपासून मीसुद्धा श्री साईबाबांची भक्त बनून त्यांची मनात स्थापना केली ती आजपावेतो.

"कधीही वाईट आणू नये मनाशी"
"श्री साईबाबा असती आमच्या पाठीशी"

# भुपाळी

चाल :— आनंद कंद ऐसा

चल उठ साईनाथा का झोपला मुरारी
उदयास भानु आला तू सृष्टिचा चीतारी ॥धृ॥

कमले जलांत फुलली पाण्यास संथ लहरी
किल बील पाखराची मधु गोड ऐक गाणी
धेनु सवत्स धावे चरण्यास जाई रानी
धारोष्ण दुध आवडे भरली तुझीहि झारी ॥१॥

अंकावरी तुलाही घेउनी हिंद माता
राजीव नेत्र पुसते जी खेळवी अनंता
भाग्यास पार नाही अवधूत निर्वीकारी
सोडूनी वैभवाते का मारली भरारी ॥२॥

कमरेस लावी लुंगी कफनीही घाली आंगी
तव पायी या खडावा डोईस एक चींधी
लीला अनंत तुझ्या बघता मनास भारी
शिरडीस पातला का होउनी तू भिकारी ॥३॥

तू संत शिरडीचा किर्ती फुले जगात
तव मुर्तीचे पुजारी दिसती करा घरात
करिती अनन्य भक्ती ठेउनी भाव भोळा
ये धाव पाव साई दे भेट एक वेळा ॥४॥

—श्रीमती रुक्मिणी वेंद्रे
सेंट्रल बँके जवळ, राहुरी जि. अहमदनगर

# माझे गुरु पणजोबा—श्रीसाईबाबा

—अलोक तेंडुलकर
शांतीसदन—फ्रेंचब्रीज मुंबई ७.



मी अलोक तेंडुलकर "साईनाथ भजन माला"चे रचनाकार साईभक्त रघुनाथ-सावित्री माझे पणजोबा आणि पणजी. ते वांद्र्याला रहात असत. त्यावेळी वांद्र्याला पुष्कळ साई-भक्त रहात. त्यांच्या मुळे माझ्या पणजी-पणजोबांना साईभक्तीची ओढ लागली. ही दोघे शिर्डीची वारकरी झाली.

साईबाबांचे प्रत्यक्ष प्रथम दर्शन त्यांनी शिर्डीला घेतले. साईबाबांना पहाताच माझ्या पणजोबांचे मन भक्तीने एवढे दाटले की त्यांच्या डोळ्यावाटे झरझर पाणी वाहू लागले. बाबांनी त्यांना म्हटले "अरे रडतोस का असा ! तुझ्या साठी रडायला मी आहे. तुला बारा गाड्या सोने देऊ ? समाधान होईल तुझं ! "

"मला सोनं नको. माऊली, तुझे पाय आमच्या हृदयात दे." पणजोबा बोलले.

"अरे ते कधीच दिले आहेत" बाबा म्हणाले. माझ्या पणजोबांना फार आनंद झाला. माझ्या पणजीबाई—सावित्रीबाई साई-बाबांवर भक्तीपूर्ण भजने रचीत आणि आपल्या सुरेल, खड्या आवाजात एकतारीवर, रोज सायंकाळी गात असत. माझ्या पणजोबांना मात्र त्याचा गंध नव्हता. ते एका इंग्लीश कंपनीत हेड क्लार्कच्या हुद्यावर होते. मराठीचा अभ्यास जेमतेम. पण शिर्डीहून परतल्यावर तेही भजनं रचू लागले, म्हणू लागले. लवकरच एक हजार भजनांची साईनाथ भजनमाला तयार झाली. आमचं घर साईमय झालं. बाबांचं वास्तव्य आमच्या घरी झालं.

सावित्रीबाईंनी आपल्या धाकट्या मुलाला म्हणजे माझ्या आजोबांना ( माधवराव तेंडुलकर ) ते ८ वर्षांचे असताना बाबांकडं शिर्डीला ठेवलं. बाबा स्वतः त्यांची देखभाल करीत. खाणपिण भिक्षेला बरोबर नेणं लेंडी बागेत फेरफटका, भक्तांचा दरबार आणि रात्री चावडीत बाबांच्या फळीशेजारी झोपणं. कसा झक्क कार्यक्रम होता.

आजोबाना बाबांच्या आंघोळीचा समारंभ फार आवडे. बाबांना अंगावरची कफनी काढून चौरंगावर बसवण्यात येई. चांदीची घंघाळ भरून पाणी असे. वाद्यांच्या गोड सुरात त्यांचे शिष्य बाबांना न्हाऊ घालत. त्यांच्या डोक्यावर पाणी ओतले की, आजोबा टाळ्या पिटून नाचू लागत. मलासुद्धा आवडले असते बाबांकडे रहायला. बाबांना पितांबर नेसवत. त्यांची पूजा करीत. भजन चालूच असे आणि मेघा नावाचा त्यांचा शिष्य एका पायावर उभा राहून बाबांची आरती तासचे तास करी. नंतर बाबांचा दरबार भरे. गप्पागोष्टी चालत. भक्त आणि देव एकरूप होत. प्रसाद वाटला जाई. रोज कुणी ना कुणी आपले काम झाले म्हणून पेढे, मिठाई आणून देई. ती ताटात भरून वाटायचं काम आजोबांकडे येई. गर्दी खूप असे. आजोबांना सारखे वाटे की, मिठाई संपेल आणि ताटातली आपणाला काही मिळणार नाही. अशा धाकधूकीत ते प्रसाद वाटत. नजर सारखी प्रसाद संपतो की काय यावर असे. पण प्रसाद सर्वांना भरपूर वाटून झाला तरी ताटात भरपूर उरे. तो संपला असे एकदाही झाले नाही. उलट आजोबाना पोटभर मिळे. पण रोज त्यांना धाकधूक मात्र वाटे.

बाबा भिक्षा घेऊन परतले की भिक्षेतून आजोबांचा वाटा काढीत. किती भाग्य-वान आजोबा त्यांच्या घासाची सोय बाबांनीच केली. रात्री त्यांच्या अंगावरचे पांघरूण सारखे करीत. एकदातर गमतच झाली. बाबा चावडीत एका फळीवर झोपत ती फळी बरीच उंच अधांतरी टांगलेली असे. बाबा त्या फळीवर कधी आणि कसे चढतात ते कुणी पाहिलं नव्हतं. त्याबद्दल चर्चा होई. आजोबांना वाटले आपण फळीजवळ झोपतो. तर आपण बघू बाबा कसे वर चढतात ते. रात्री झोपायला म्हणून आपल्या जागेवर ते लोटले आणि बाबांच्याकडे टक लावून पाहू लागले. तिथे एक खांब होता. बाबांनी त्या खांबाला हाताचा विळखा घातला आणि डोलू लागले. तोंडाने सुंदर ओवी गुणगुणू लागले.

> " ज्यानं वाचली ज्ञानेश्वरी ।
>
> हाती धरली दोरी ॥

ही ओळ घोळू लागले; या अंगाई गीतानं आजोबांना झोप कधी लागली ती कळलेच नाही.

एकदा प्रसाद वाटायच्या आधी बाबांनी आपल्या टमरेलात पाणी ओतले आणि मूठभर साखर आत टाकली. आजोबांना ते म्हणाले, " एड-पी त्ये सारं." आजोबांची नजर प्रसादावर. ते साखरपाणी प्यायला नाखूष. बाबांनी ते पाहिले " पी म्हणतोना. पी त्ये सारं." बाबांनी दरडावले. आजोबांना मुकाट्याने सर्व पाणी प्यायला लागले. नंतर नेहमीप्रमाणे प्रसाद वाटून उरला. प्रसाद खाल्ला आणि खाली बसले. तोच त्यांच्या अंगात सणसणून ताप भरला. " जा. जा तू वंड्या. झोप जाऊन. तुझी आई येत्येय. ती सांगेल मला." आजोबा दिक्षितांच्या वाड्यात जाऊन झोपले, एवढ्यातच आई वांद्रयाहून आल्या. पाहतात तो मुलगा तापाने बेहोष. त्याच्या अंगावर पांघरुण घालून त्या बाबांची धुळभेट घ्यायला मशिदीत गेल्या. " बाबा, पोर तापानं फणफणतंय." आई म्हणाल्या. " काय करणार त्याला. उन्हातान्हात फिरतो. चिंचा बोरे खातो. ऐकत नाही. ताप येणारच. पण तो आला तसा जाईल." त्यानंतर ते इतर गोष्टी बोलू लागले. आई परत वाड्यात आल्यावर दरम्यान आजोबांना एक मोठा काळा काळा झाडा झाला होता व घाम येऊन ताप निघाला होता.

बाबांचा हा सहवास आजोबांना जन्माचा ब्रह्मानंद देणारा झाला. त्यांची प्रतिभा चौफेर फुलू लागली. त्यांनी संस्कृत शिवकवच मराठीमध्ये ओवीबद्ध एका बैठकीमध्ये केले. त्यांची वृत्ती नेहमीची समाधानी आणि निरपेक्ष. तुझा माझा असा भेद नाही. राग लोभ नाही. अत्यानंदात तल्लीन. आम्ही त्यांचे वंशज अशा अपूर्व ठेव्याचे वारस. साईबाबा आमचे गुरु पणजोबा. धन्य आम्ही.

☆

## श्री साईबाबा भक्तमंडळ, नवापूर

• श्रीसाईबाबा भक्तमंडळ, नवापूर जि. धुळे येथे श्रीबाबांचा गुरुपौर्णिमा उत्सव ता. २७ जुलै १९८० रोजी अतीव उत्साहाने साजरा करण्यात आला. यानिमित्य गुरुपूजन, अभिषेक, श्रीसत्यनारायण पूजा, श्रीसाईपोथीचे पारायण, भजन इ. विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

# मी शिरडीत काय काय बघितले

—कु. प्रफुल्ल माधव फणसे
फणसेवाडा जुना दुधनाका, कल्याण,

● मेघांचा गडगडाट, विजांचा चमचमाट, घोंघावणारे भयानक वारे, व याच्याच जोडीला सर्व सृष्टीला चोपून काढणारा अखंड पाऊस, दोन फुटावरचं माणूस दिसत नव्हतं. अशा स्थितित पशु पक्ष्यांचे काय विचारता ! ती बिचारी कुठे गडप होवून बसली होती देव जाणे.

सगळे शिर्डी गाव ह्या पावसाने हवाल दिल झाले होते सगळीकडे पाणीच पाणी, पाऊस थांबायला तयार नव्हता आणि मग गावातील सगळ्या जणानी विचार केला की, आपल्यावर परमेश्वराचाच कोप झालाय आणि आता आपणास तोच वाचवू शकेल ह्याच वेळी गावातील सूज्ञ लोकांनी विचार केला की, आपण आत फक्त त्या मशिदीमधील फकीराला सांगू या की, 'बाबारे तू हे सगळ बघतच आहेस, आणि आता तूच आम्हाला वाचवू शकतोस.'

प्रतिष्ठित लोकांची सृष्टीबद्दलची भयानकता लक्षात येण्यास त्या मशिदीतील फकीरास वेळ लागला नाही. ते वर्णन ऐकताच त्या फकिराने बाहेर येवून सृष्टीला आवाज दिला. आवाज कसला तो. ती होती आज्ञा आणि ती सुद्धा 'अमानव निर्मित शक्तीची' ती ऐकताच क्षणार्धात सृष्टीचे रूप पालटले. आज्ञाधारक कुत्र्याप्रमाणे मेघांचा गडगडाट थांबला वीजांचे डोळे दिपविणारी वलये नाहीशी झाली. मेघ सुद्धा शपथ घातल्या प्रमाणे थांबले. माणसानी श्वास सोडला. उपस्थित असलेल्या मंडळीनी साष्टांग नमस्कार त्या धर्मात्म्यास घातला. पक्षांनीसुद्धा पंख पसरून आपणही आनंदात सहभागी झाल्याचे दाखविले. त्या फकिरास ह्या सर्वांची मजा वाटली व किंचितच हसून पुन्हा मशिदीतील अखंड अग्नीपुढे स्थानापन्न झाला.

ज्या वेळेस ही घटना घडली तीला आज अनेक वर्षे म्हणजे जवळ जवळ सदुसष्ट ते अडुसष्ट वर्षे झाली आहेत. पण तरीसुद्धा माझ्या डोळयासमोर हा प्रसंग हुबेहुब दिसतो आहे. मी उभा आहे हे ठिकाण म्हणजेच पूर्वीची मशिद होय आणि मी उभा असलेल्या त्याच वास्तुस आज द्वारकामाई म्हणतात.

श्रीसाईनीं ही जी धुनी स्वहस्ते प्रज्वलीत केली आहे. ती आमची शक्तीमाता ठरली आहे. अजूनहि ती अखंडपणे स्वतः जळत असून अनेकांच्या शारिरिक व मानसिक व्यथा तिच्यापासून निर्माण होणाऱ्या उदीपासून नाहिशा होत आहेत. कारण श्रद्धेचे तेल तिच्यात भक्तांकरवी ओतले जात आहे.

ती कायम प्रज्वलित ठेवण्यासाठी किती खर्च जळनासाठी येत असावा व किती कष्ट हे करण्यासाठी करावे लागत असतील. हे फक्त शिर्डी संस्थानच जाणो! तो एक व्यवहारिक विचार होय.

ही द्वारकामाई आता बऱ्याच सुधारणासहित दिसत असली तरीसुद्धा त्या वेळेची हीची अवस्था फारच वाईट असेल.

आता ह्यामध्ये श्रीसाई व त्यांचे धनिष्ट भक्त ह्यांचा मेळा भरत असे व तिचे त्यावेळेचे दृश्यमान अतिशय लोभसवाण असेल ह्यात शंकाच नाही. येथे जाते, श्रीसाईचा गालीचा म्हणजेच दगड व त्यांनी स्पर्श केलेल्या वस्तु येथे दिसतात.

आता पंधरा पावले पूर्वेला जावू हीच ती बाबांची चावडी होय बाबांच्या दिनचर्येपैकी बराचसा भाग (वेळ), येथे बाबा घालवित.

ह्या चावडीच्या समोरील वाडा हा चितांवरांचा वाडा होय. ह्या मंडळीवर बाबांची कृपादृष्टी आहे आणि म्हणूनच ही चितांबर मंडळी शैक्षणिक क्षेत्रात प्रगती-पथावर आहेत.

आता येथून दक्षिणेस अर्धा फर्लांगाऱ्याही आतमध्ये दुसरे साईभक्त रहातात अर्थात त्यांचा वंश तेथे आहे. हे घर म्हणजे श्री साईनाथांना ज्यांनी प्रथम 'आवो साई' म्हणून हाक मारली त्या 'म्हाळसापती' ह्यांचे होय. हे खरे खंडेरायाचे भक्त होत पण श्रीसाईनी आपली पण सेवा ह्यांना करावयास अनुमती दिली.

आता आपण श्रीसाई समाधी मंदिरात येवू या. अतिशय स्वच्छ अशा

वास्तूमध्ये आपण प्रवेश करीत असल्याचे आता आपणास जाणवत असेल. आणि अशा प्रकारे स्वच्छता जे हे संस्थान ठेवतं, त्याबद्दल त्या सर्व श्री साईसेवा भक्तांना मनातून न कळत आशीर्वाद द्यावेसे वाटतात. "स्वच्छता हा दैवी गुणच आहे." ह्या महात्मा गांधीच्या वाक्याची प्रचिती येथे आपणास येते.

'श्री साई समाधी मंदिर' हा बोर्ड वाचत असताना मनात मात्र करूणा तयार होत असते व त्या समाधी मंदिराची एक एक पायरी चढताना त्या करुणेचा अंत होत जातो व समोर श्रीसाई साक्षात प्रगट होताच मान अतिशय नम्रतेने लीन

होते. डोळयांच्या कडा भरून येतात आणि सभामंडपातून श्री साई समाधीजवळ जाताना डोळयातून धारा वाहू लागतात. हा प्रकार का होतो हे मला समजत नाही. किंवा ह्यावर बोलता लिहिता येत नाही. ही साईमूर्ती नंतर बनविलेली आहे. ही जी समोर समाधी आहे हे ना ते श्रद्धास्थान, आशास्थान व ह्या पावन भूमिमधील अतिशय पवित्र अशी वास्तू होय. आपण दोन क्षण स्तब्ध राहू या. अतिशय स्तब्ध.

हं तर मी काय म्हणतो हा वाडा पूर्वीचा दीक्षीतांचा वाडा होता. येथे श्रीकृष्णाचे देवूळ बांधावयाचे होते. पण श्रींनी स्वतःसाठी समाधी तयार करविली, कारण दीक्षींताच्या मनातील इच्छा श्री साईंनी ओळखल्या होत्या.

आता ह्या सर्व वस्तू श्रीसाईंनी हाताळलेल्या आहेत. त्या त्यांच्या कफन्या, जोडे, गव्हाचे पोते, ग्रामोफोन, छुंबरे, पट्टे, चिलीमी, चांदीच्या साखळया, वेगवेगळया मण्यांच्या माळा, ह्या सर्व वस्तू स्वतः ते वापरीत किंवा दुसऱ्या कोणासही वापरावयास देत असत.

श्री समाधीमधील दैनिक कार्यक्रम ठरलेले आहेत. सकाळी पाच वाजता मंदिर भक्तासाठी खुले करतात. सकाळी साडेपाचला काकड आरती. सहा वाजता ' श्रीना ' मंगलस्नान घालण्यात येते. हा सोहळा पहाणारे खरच भाग्यवान होत. तर नंतर साडेसातला भक्ताकरवी अभिषेक घालण्यात येतात ते साडेअकरापर्यंत चालतात. नंतर बारा वाजता नैवेद्य आरती होते. ह्या वेळेस बाबांना भोजनाला आमंत्रित केले जाते. प्रथम तेथील रहिवाशी कोतेपाटील ह्यांचा नैवेद्य बाबांना दिला जातो. कारण बाबांच्या हयातीत श्रीगणपत पाटील नावाचे भक्त होते. त्यांच्या भाविक पत्नी सौ. बायजाबाई ह्या रोज न चुकता बाबांना भाकरी आणून देत असत व बाबासुद्धा अतिशय आवडीने त्या भाकरीचा स्वाद घेत. त्यामुळे ही चालू असलेली प्रथा अजूनहि कायम आहे. नंतर मंदिर भक्तासाठी खुले ठेवले जाते, संध्याकाळी साडेसहाला धुपआरती होते व रात्री दहा वाजता शेजारती होवून मंदिर बंद केले जाते.

आता आपण बाहेर येवू या. हा सगळा परिसर मुंबईकडील इमारतीसारख्या इमारतीनी भरून गेला आहे. ह्या सर्व इमारती नवून भक्तांसाठी केलेली निवासाची सोय होय. येथे अनेक भक्त लांब लांबूनच नव्हे, तर परदेशातूनही येतात. म्हणून जास्तीत जास्त भक्तांसाठी ह्या इमारतीचा उपयोग होतो. अर्थात् ह्याच बरोबर हे पण मान्य करावे लागते ही ह्या संस्थानमध्ये काम करणारे लोक अतिशय सोशिक कष्टाळू आहेत.

तर समोरच पहा ही वाघाची समाधी दिसत आहे. श्रीसाई असताना एक दिवस एक वाघ श्री साईजवळ आला व बसला श्री साईंनी त्याही अवस्थेत त्याला

ओळखले असणार कारण श्री साई आपल्या भक्तास कुठल्याही जन्मात ताबडतोब ओळखतात. तर पुढे काय झाले. त्या वाघाच्या मस्तकावरून श्रीसाईंनी हात फिरवला व काही वेळातच त्या 'वाघारूने' आपला पशु जन्म श्री साई समोरच संपविला. त्या स्मरणार्थ ही वास्तू होय.

" गुरुस्थान " ह्याचा महिमा असा की, श्री साईंनी काही भक्त मंडळीस येथे जमिन खणावयास लावली व काही भाग खणल्यानंतर आतमध्ये एक अतिशय लोभसवाण दृश्य तेथे उपस्थित असलेल्या भक्तांना दिसले आणि ते म्हणजे नुकतीच तेथील वास्तूची पुजा केल्यासारखी वाटत होती. स्वच्छ फुले, तेथे होती व नुकत्याच कोणातरी निरांजनी लावाव्यात त्याच प्रमाणे निरांजनी लावलेल्या दिसत होत्या. त्या सर्वांना बाबांनी नमस्कार केला व सांगितले की, ही जागा माझ्या गुरुचे स्थान आहे. " येथे दर गुरूवारी व शुक्रवारी जो कोणी श्रद्धापूर्वक धूप जाळील त्यास कुठलेही संकट आले तरी त्यास जाचक त्रास होणार नाही.

ह्याच गुरुस्थानातून एक वैचित्र्यपूर्ण लिंबाचे झाड आले आहे. त्याच्या ठराविक फांदीस असणारी पाने अतिशय मधूर व गोड लागतात. ही गोष्ट येथील बऱ्याच गोष्टींचा पुरावा किंवा साक्ष देत आहे.

आता समोर कारंजाच्या मागील बाजूस लेंडीबाग आहे. हींच्यामध्ये प्रवेश करताना तीन छानपैकी 'चवथऱ्या' आपणास उजव्या हातास लागतात. ह्या चवथऱ्या 'श्री साईंच्या' भक्तापैकी असून त्यांनासुद्धा अतिशय आदरपूर्वक मान संस्थान तर्फे दिला जात असल्याचे आपणास दिसून येईल.

लेंडीबाग ही बाबांची एक 'प्रार्थनेची म्हणा' किवा साधनेची म्हणा जागा होती. कारण बाबा सकाळ संध्याकाळ या बागेत येत मात्र आतमध्ये कुणासही येवू देत नसत.

आता आपण एस.टी स्टँडकडे जाताना एस. टी. स्थानकापासून अर्धा मिनिटावर पश्चिमेकडे जे देऊळ दिसते तेच खंडेरायाचे देऊळ होय येथेच श्री साईभक्त नेहमी पुजा अर्चा करावयाचे.

हे मंदिराच्या बाहेरील बाजूस बसलेले श्रीसाईभक्त ' मार्तंड होत. हे म्हाळसापतीचे सुपुत्र असुन ह्यांचीच शादी स्वतः श्रीसाईंनी ठरविलेली आहे . चला त्यांना नमस्कार करू या !

आता येथून सरळ रस्त्याने पुढे चार मैलावर साकोरी नावाचे गाव आहे तेथे श्रीसाईभक्त उपासनी महाराजांचा मठ आहे. ते सुद्धा अतिशय छान ठिकाण आहे तेथील सामाजिक कार्य आजसुद्धा आपल्या राष्ट्रीय हितात सहभागी होतय.

आता एस. टी सुटणार वाटतं. अरे अरे माझी ही सहल किती आनंदात घालविली. आणि आता पुन्हा डोळयाच्या पापण्या ओल्या झाल्यात त्यासुद्धा परत परत मला श्रीसाईसमाधी मंदिरात नेत आहेत आणि आता मात्र मनात फारच खळबळ उडाली आहे मी एस. टी.त मन मात्र श्री समाधीमंदिरात द्विधा द्विधा अवस्थेत मी...

# साईबाबा मला खूपखूप आवडतात

☆ ☆ ☆

—चि. दिपक कुमार रेवणकर
कुंटोली, बालाजी मंदिराजवळ, अंबरनाथ

● त्या शनिवारची आठवण माझ्या स्मृतित कायम राहील कारण तसे नेहमीचे शनिवार आम्हाला फार त्रासदायक जातात. म्हणून त्या शनिवारचा दिवस उगवल्या पासून मला खूपखूप आईची काळजी वाटत होती. कारण आठ दिवसापूर्वी माझी आई काही जरूरीच्या कामासाठी गावी गेलेली. दोन दिवसाने परत येणारी आई पुरे आठ दिवस झाले तरी परत आली नव्हती शिवाय पत्र वगैरे काहीच नव्हते. त्यातही आई एकटीच गेलेली म्हणून खुपच काळजी वाटत होती.

आणि हा शनिवार म्हणजे घाबरवणारा वार म्हणून मला खूप खूप भिती वाटू लागली. मी सकाळी उठून बाबांच्या फोटोपुढे जावून रडत रडतच बाबांना म्हणालो "बाबा मला आईची खुप खुप काळजी वाटतेय. अजून तिचे पत्रही नाही. तरी तिच्या कामात तिला काही व्यत्यय वगैरे आला नसेल ना ! तुम्हीच तिचे सर्वप्रकारे रक्षण करा व आज सायं ५ वाजे पर्यंत आईचे पत्र किंवा आई येवू दे ! त्या शिवाय मी जेवणारही नाही ! व आल्यास तुमच्या फोटोला सोन्याचा टिळा लावण्यास वडिलांना सांगेन. एवढी बाबांच्याकडे प्रार्थना करून मी शाळेत गेलो ! १॥ ला शाळेतून आलो. पण अजून पर्यंत आईचे पत्र वगैरे काहीच नव्हत ! घरात सर्वांनाच काळजी वाटत होती ? मी जेवण केलं नाही ! माझ्या छोट्या भावाने चि. मनोजनेही जेवण केलं नाही. त्यामुळे सहाजीकच सर्वजण उपाशीच राहीली. अशातच दुपारचे ४ वाजले. छोटा मनोज सारखा बाबांच्याकडे जावून रडत होता. एवढ्यात पोष्टमन तार घेवून आला. वडील नसल्याकारणाने मीच सही करून तार घेतली व वाचू लागलो काळजी करू नका दोन दिवसात मी येत आहे अशी ती आईचीच तार होती. मला खूपखूप आनंद झाला. मी प्रथम बाबांच्याकडे तार ठेवून बाबांना अगदी मनःपूर्वक नमस्कार केला. थोड्या वेळांनी वडील आले. त्यांनाही खूप आनंद झाला मग मी सांगितलेला सोन्याचा टिळा बनवण्यास वडिलांना सांगितले. वडीलांनी तेव्हाच ( सोनारच स्वतः असल्याने ) बनवून बाबांच्या फोटोला तो सोन्याचा टिळा लावलाही नंतर दोन दिवसांनी माझी आई सुखरूप आली.

आई ज्या कामासाठी गेलेली त्या कामात तिला खूपच व्यत्यय आला होता. पण प्रसंगानुरूप साईंच्या कृपेने आईंना एक साईभक्त इन्स्पेक्टर व वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी बरेच सहाय्य केले. यामुळे आई सुखरुप परत आली. आई म्हणते प्रत्यक्ष साईबाबांनीच माझ्या संरक्षणासाठी त्या डी. एस. पी. साहेबांना व इन्स्पेक्टरना पाठविल्यामुळेच मी सुखरुप परत येऊ शकले. अन योगायोगाने तेही साईभक्त म्हणजे ही सर्व साईचीच किमया नाही का? आई म्हणते, "पोलीसखात्यात अशी पैशाची आशा न धरता अनाथाचे रक्षण करणारी कर्तव्यदक्ष माणसे भेटणे व असणे म्हणजे जणू काही जनतेला व संकटात सापडलेल्यांना लॉटरीच जणू. एवढे ते चांगले होते. त्यावेळी मला साईबाबांच्या वचनांची खूप खूप आठवण झाली. "तुमचा मी भार वाहीन सर्वथा नव्हे अन्यथा वचन हे माझे!" खरोखर बाबा किती किती भक्तांची काळजी वाहणारे, ममतेने कुरवाळणारे, खाऊ घालणारे थोर माता, पिता सद्गुरू आहेत.

माझी आई नेहमी म्हणायची–संकटकाळी बाबांचा धावा करताच बाबा आपले रक्षण करतात तसे मला नेहमीच परीक्षेत काही प्रश्नाचे उत्तर आठवेना झाल्यास बाबांचे नाव घेताच आठवत असे. म्हणूनच बाबा मला खूप खूप आवडतात. १५.६

मी व माझा भाऊ नेहमी शाळेत जाताना बाहेर कोठेही जाताना बाबांना नमस्कार केल्याविना जातच नाही. रात्री झोपतानाही बाबांना नमस्कार करून सायंकाळी भजन म्हणूनच आम्ही झोपी जातो. आमच्या घरातील आम्ही सर्वजण साईभक्त आहोत. आईला तर सर्वजण "साईवेडी"च म्हणतात. आहेतच आमचे साईबाबा तसे खूप खूप चांगले. "दिसतात फकीर पण आहेत

कुबेराहूनही कुबेर!"

अशा या साईबाबांच्या चरणी माझे अनंतानंत नमस्कार.

★

# बाबा, साक्षात्कारी संत

—सुरेश कुमार पांडुरंग धुरी
पंतनगर, घाटकोपर

श्री सदगुरु साईबाबांच्या तत्कालीन निकटवर्तियांपैकी श्री म्हाळसापती भगत हे होत. म्हाळसापती चिमणाजी नागरे हे जातीने तसेच व्यवसायाने सोनार होते. म्हाळसापती हे खंडोबारायाचे निस्सीम उपासक होते. पूर्ववयात ते सोनारकीचा धंदा करीत. परंतु ईश्वर भक्तीतच सारे लक्ष लागल्यामुळे त्यांना त्यात यश आले नाही. तेव्हापासून त्यांनी उर्वरित आयुष्य ईश्वर भक्तीत घालविण्याचा निर्णय घेतला. म्हाळसापती आपल्या अप्पा जागले, काशीराम शिंपी यांच्या सहाय्याने यथाशक्ती साधुसंत , बैरागी , फकीर यांचा आदरसत्कार करीत असत.

अशाप्रकारे आयुष्याची कालक्रमणा चालू असता एक दिवस तो सोन्याचा दिवस उगवला. शिरडीचे भाग्य उदयाला झाले .

राहत्याकडून एका मुसलमानाच्या वऱ्हाडाबरोबर एक तेजस्वी यवनवेशधारी तरूण आला. हे वऱ्हाड शिर्डी गावाच्या सीमेवर वसलेल्या म्हाळसापतींच्या श्री खंडोबारायाच्या देवळाच्या प्रांगणात उतरले. श्री खंडोबारायाच्या दर्शनास तो तेजस्वी यवनवेशधारी गेला असता देवळाच्या पुजाऱ्याने त्याला आत येण्यास मनाई केली. तो तरुण मंदिराबाहेरच एका वडाच्या झाडाखाली चिलीम ओढत बसला परंतु ईश्वरी संकेत निराळाच होता. तेवढ्यात म्हाळसापती तेथे आले माणसांची योग्यता ओळखण्यात ते पारंगत होते. वडाखाली बसलेल्या त्या तेजोराशीकडे पहाताच म्हाळसापतीचे मन उन्मन झाले. उस्फूर्तपणे ते उद्गारले ' आओ साईबाबा ' साईबाबांमध्ये वसत असलेल्या हृदयस्थ नारायणाचा साक्षात्कार त्यांना झाला व येथूनच त्या तरुणास साईबाबा हे नाव पडले.

साईच्या मूळ ठिकाणचा त्यांच्या कुळाचा काहीच शोध लागत नाही. अनेक भक्तांनी याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. अनेक दाखले दिले. श्रीसाईशरणानंदांच्या म्हणण्याप्रमाणे श्रीसाईचा जन्म पाथरीत एका देशस्थ यजुर्वेदी ब्राम्हण कुळात झाला. त्यांना श्रीसाईबाबांनी स्वतः सांगितलेली माहिती पुढीलप्रमाणे ते ( साईनाथ ) वयाच्या आठव्या वर्षी आईवडिलांना सोडून घराबाहेर पडले. गोदाकाठाने भ्रमण करीत निघाले व एका फकीराबरोबर गेले.' दादासाहेब खापर्डे यांना सांगितलेली माहीती पुढीलप्रमाणे 'वाट पाथरीची आहे. तेथून शैलूद (सेलू) माणूर (मानवत ) व जालनापूर मी एकदा

गेलो होतो. आठ दिवस लागले गवतातून चालावे तेथेच निजावे ' (शिरडी डायरी–१० डिसेंबर १९११)

बाबा शिरडीत आल्यापासून एका मशीदीत रहात असत. ती मशीद अगदी मोडकळीस आली होती. बाबा दिवसा इकडे तिकडे हिंडत. रात्री मुक्कामाला मात्र मशीदीत येत. दिवसा ते एका निंबवृक्षाखाली बसत. एखाद्या भ्रमिष्टासारखे त्यांचे आचरण असे ते पाहून लोक त्यांना वेडा फकीर म्हणत. हातात पत्र्याचे जुनाट टमरेल व मळकट झोळी घेवून ते भिक्षा मागत. 'भाकर दे ग माय!' ही त्यांची हाक सर्वांनाच मनात करुणा निर्माण करीत असे.

बाबांना दिवे लावून मशीद सजवण्यात मनस्वी आनंद होत असे. या रोषणाई-साठी ते गावातील वाण्यांकडे तेल मागत असत. हळूहळू व्यापारी कंटाळले. त्यांनी संगमनताने बाबांना तेल देण्याचे नाकारले. बाबांनी द्वारकामाईत येऊन सर्व पणत्या गोळा केल्या. त्यात काकडे घातले व आपल्या टमरेलात पाणी घेऊन ते पणत्यात ओतले. बाबांच्या ह्या सर्व लीला लोक पहात होते. त्यांना हा सर्व निव्वळ वेडेपणा वाटला होता. बाबांनी पणत्या पेटवल्या व त्या रात्रभर जळत राहील्या. उपहासगर्भ दृष्टीने बाबांची फजिती पहावयास आलेल्या लोकांचाच पाणऊतारा झाला होता. या चमत्कारामुळे लोकांना बाबात असणाऱ्या दैवी सामर्थ्याची प्रचिती आली व सर्व वाणी लोक त्यांना शरण आले व बाबांभोवतीच्या म्हाळसापती, आप्पा जागले, काशीराम शिंपी या भक्तांखेरीज इतर भक्तांचेही वलय बाबांभोवती निर्माण होऊ लागले. बाबांनी केलेला पणत्यांचा चमत्कार हा बाबांनी पुढे केलेल्या चमत्का-रांची केवळ नांदीच होती. पुढे शिरडीवासीयानी बाबांची पूजा व आरती करण्याचा प्रघात सुरू केला.

बाबांच्या ठिकाणी सत्व रज तम या तिनही गुणांचा समन्वय झाला होता. भक्तांवर कृपेचा वर्षाव करताना त्यांच्यातील सत्व गुणांचा प्रत्यय येत असे. भक्तांच्या दुःखाचे हरण करताना त्यांच्यावर औषधोपचार करताना त्यांच्यातील रजो गुणाचा प्रत्यय येत असे. कधी कधी अनिष्टाची चाहूल लागली असता अथवा विघटनाचा पदरव ऐकू येताक्षणी ते रुद्रावतार धारण करत व त्यांच्यातील तमोगुणांचा प्रत्यय लोकांना येत असे.

बाबा हे साक्षात्कारी संत होते. मीच परब्रह्म आहे याचा अनुभव त्यांनी घेतलेला होता. परंतु लोकान्तात आल्यावर ते म्हणत 'अल्लाह मालिक हैं' सर्व भूतमात्रांवर प्रेम करा. राम व रहीम एकच आहेत. बाबा हे एक अवतारी महा-पुरुष होते. या अवतारी महापुरुषाचे कार्य केवळ एका धर्मापुरते सिमीत नव्हते. 'सर्वधर्मसमन्वय' हेच त्यांचे खरे अवतारकार्य होते. 'वसुधैव कुटुंबकम्' हीच

त्यांची अंतिम दृष्टी होती. दया हा बाबांच्या उपदेश वाणीतील प्रमुख घटक होता. बाबा अंतर्ज्ञानी होते. आलेला भक्त कोणत्या देवतेचा उपासक आहे हे ते न सांगता ओळखत व त्याला त्याच देवतेची उपासना करण्यास ते सांगत. आपणच विठ्ठल होऊन विठ्ठलाची उपासना विठ्ठलभक्तांना रामाची उपासना रामभक्तांना करावयास सांगणारे बाबा परमात्मा सर्वत्र एकच आहे व आपण त्याच्या कल्पित रूपाशी परंपरेने समरस झालेले आहोत त्या रूपाची भक्ती करणे म्हणजेच अंतिमदृष्ट्या त्या एकमेवाद्वितीय परमतत्वांशीच सुखसंवाद साधणे होय या परमश्रेष्ठ अनुभूतीला जाऊन पोहोचले होते.

बाबांनी सांप्रदायिक दृष्टी कधीच बाळगली नाही. त्यांची पारमार्थिक दृष्टी धर्म, पंथ, संप्रदाय यांच्या पलिकडील होती. बाबांचा परमार्थिक अधिकार थोर होता. ते साक्षात्कारी योगी होते. त्यांच्यात अलौकिक दैवीशक्तींचे स्फुरण झाले होते. ते सद्‌गुरुच्या भूमिकेतून परमात्मरुप पावले होते. त्यांची ही पारमार्थिक साधना एकाएकी फळास आली नव्हती. त्यांचा परमार्थ डोळस होता. त्यांनी अनेक ग्रंथांचे अध्ययन केले होते. बाबा स्वतः योगी होते. परंतु योग्यासारखा दुस्तर खडतर मार्ग त्यांनी आपल्या भक्तांना कधीच सांगितला नाही. सत्संग सेवा, सद्‌वर्तन, परमात्म्या विषयी उत्कट भक्ती यांनी परमेश्वर प्राप्ती होते अशीच शिकवण त्यांनी दिली.

बाबांनी १९१८ साली देह सोडला तो दिवस दसऱ्याचा होता. बाबांनी दसऱ्याचे सीमोल्लंघन अशाप्रकारे साजरे केले. श्रीसाई चरित्रकार म्हणतात. "बरोबरच दोन वर्षापूर्वी याच वेळेला दसऱ्याच्या सीमोल्लंघनाच्या वेळी बाबा एकदम भयंकर रागावले आणि भराभर आपल्या अंगावरील कपडे काढून धुनीला टाकून रागाने डोळे लालबुंद करून गर्जना करीत ओरडले, "बघा नीट डोळे उघडे ठेवून. मी हिंदू आहे की मुसलमान आहे ते नीट पाहून घ्या." भक्त भागोजीने यावेळी बाबांस शांत करून वस्त्र परीधान करण्यास भाग पाडले. नंतर दोन वर्षांनी दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर त्यांच्या आत्म्याने धारण केलेले वस्त्र पार्थिव देह टाकून दिले आणि आपले खरे स्वरूप ओळखा असा संदेश आपल्या भक्तांना देऊन ते परमात्म्यात विलीन झाले. ★

# माझे शिरडी दर्शन

कुमार माधव वसंत सामंत
डी–८ बँक ऑफ इंडिया
वृन्दावन हौसिंग सोसायटी
कोलडोंगरी लेन नं. २.
अंधेरी पूर्व मुंबई ४०००६९

● माझ्या आईची बाबांवरची श्रद्धा–त्याला कारण तिच्या आई वडिलांचे घर–कुठलं म्हणाल तर मोठ्या अभिमानाने मी सांगू शकेन की श्री. गोविंदराव रघुनाथ दाभोलकर (हेमाडपंत) यांचा मी पणतु– ज्यांच्यामुळे आम्ही सर्वांनी शिर्डी पाहिली.

माझ्या आईच्या आजोबांपासून ( माझे पणजोबा ) साईबाबांचे एकमेव दैवत. दाभोलकरांकडे म्हणजे सध्या माझ्या आजोबांकडे पाहिले, ऐकले. माझ्या पणजोबांनीच श्रीसाई सच्चरित्र लिहिले. त्यांचा फोटो मला शिर्डीत बाबांसमोर असलेल्या दालनात बघायला मिळाला. दुसरेही भक्तांचे फोटो मी बघीतले, पण माझ्या पणजोबांचा फोटो पाहून मला मोठा अभिमान वाटला. त्यांनी लिहिलेले **प्रथम मराठी श्रीसाई सच्चरित्र** आज कित्येक वर्ष बाबांकडे येणारे भक्त आदराने वाचतात द्वारकामाईत बसून बऱ्याच लोकांना मी ते पुस्तक वाचताना पण पाहिलेय. ते श्लोकात आहे. मोठा झाल्यावर मी पण ते वाचणार आहे. त्यांनी एवढे लिहिले, मी ते वाचलच पाहिजे, नाही का ?

प्रथम मी शिर्डीत गेलो ते आईने मला पाच महिन्याचा नेला असे ती सांगत होती. तेव्हाच मी काहीच सांगु शकत नाही. मला बाबांच्या चरणी ठेवून ती घेऊन आली.

दुसऱ्यांदा मी गेलो तेव्हा ४ वर्षांचा असेन तेव्हा मी पाहिले ते बाबांची समाधी, त्यामागे बसलेले बाबा आणि पुढेच बसलेले पुजारी, मी नमस्कार केला. पुजाऱ्यांनी प्रसाद दिला. नंतर मी बघीतले सर्वजण एका भांड्यातून काहीतरी घेऊन आपल्या कपाळाला लावत आहेत. लगेच मी आईला विचारले. तिने सांगितले आपण घरी उदी लावतो ना तीच ती. मी पण लावली.

नंतर खुप फिरलो – आईने मला एक बाबांचे लॉकेट घेऊन दिले. ते माझ्या गळ्यात आहे. तिथले लोक साधे, लहानापासून मोठ्यांपर्यंत टोपीवाले सायकलवरून द्राक्ष, बोर, पेरु विकणारे–मजाच मजा.

पण तिसऱ्यांदा मी गेलो तेव्हा चांगला ८ वर्षांचा होतो. माझ्या आजोबा-बरोबर (डॉ. गजनान गोविंदराव दाभोलकर) मी गेलो होतो. आंघोळ करून बाबांचे दर्शन घेतलं. नंतर आम्ही **द्वारकामाईत** गेलो. तिथे बाबांचा फोटो बघीतला. अखंड पेटणारी धुनी बघीतली. आई म्हणाली बाबांनी चालू केलेला विस्तव अजून सर्वांनी चालू ठेवलाय. तिथलीच विभूती लोक उदी म्हणून मोठ्या प्रेमाने लावतात. त्या उदीची गोष्ट आई म्हणाली की सर्वांपासून ती तुझं, तसंच सर्वांचे रक्षण करते. मला ताप आला की प्रथम ती उदीच लावते. मग डॉक्टर आणि खरंच ताप लगेच गुल होतो. तसेच मी परीक्षेला जाताना पण ती लावते.

त्यानंतर बधितली ती **चावडी** – आई बाहेरच थांबली. मी बघतच राहिलो– पण सर्व पुरुषच जात होते. नंतर समजलं की बायकांना तिकडे मनाई आहे.

यावेळी मात्र मी पूर्णपणे शिर्डी पाहिली. पहाटेच्या शांतवेळी भक्तांनी केलेली **काकड आरती** लवकर उठून मी पण पाहिली. बाबांना सर्वांनी उठवण्याठीं केलेली आरती त्या नंतरचा लोणी साखरेचा प्रसाद – सगळे कसे छान छान वाटले. देवळातून बाहेर पडताच रंगी बेरंगी फुलांनी हारांनी भरलेली दुकाने जरा पुढे गेलात तर आंघोळीला लागलेली लाईन – येणाऱ्या तसेच जाणाऱ्या लोकांची धावपळ एकीकडे लागलेली चहाची लाईन – गाव छोटे पण पळापळ खूप – सदैव गर्दी.

सर्वात अधिक गमतीची गोष्ट बघितली. **श्रीबाबांचे गुरूसमाधी स्थान** आणि त्यावरचे **कडूलिंबाचे झाड** त्याखाली लिहिलेला बोर्ड वाचला पाने तोडण्यास मनाई आहे. पण वाऱ्याने पडलेली पाने असतात. आईने सांगितले आणि मी खाऊन बघीतले. कडूलिंबाचे पान आणि कडू नाही किती विचारात पडलो मी. पण आईने समजावले आपले बाबा त्या झाडाखाली बसायचे म्हणून ती पाने कडू नाहीत. गुरूसमाधी समोरच लोक धुप, उदबत्या आणि कापूर धुनीत घालतात.

८ वाजल्यापासून **अभिषेकाची** लागलेली लाईन. मी पण माझ्या आजोबांबरोबर अगदी बाबांच्याजवळ बसून अभिषेक केला – त्यावेळी माझ्या बालमनाला वाटले की स्वतः बाबांनी मला आपल्या मांडीवर घेतलय.

त्यानंतर **१२ ची आरती** लोक किती प्रेमाने आरत्या म्हणतात. नंतर पट्टेवाले मोठ्याने ओरडून सलामी देतात. नंतर बाबांना नैवेद्य करतात. संध्याकाळी **सांज आरती** करतात. त्यानंतर मी तिथल्या बागेत गेलो. बोर्ड वाचला लेंडीबाग – बाग खुप छान मग नाव असं काय ! पण मला सगळे हसतील म्हणून मी कुणालाच विचारले नाही. छोटेसे गाव पण खूप मोठमोठ्या बिल्डिंगज् आणि तरीसुद्धा जागेसाठी लागलेली लाईन – इकडून तिकडून धावणारे व्यवस्थापक – गरम पाणी,

दुध घेणार का म्हणून विचारत फिरणाऱ्या बायका– गजबजलेले धावपळीचे वातावरण ठिकठिकाणी ऊसाच्या रसाची दुकाने–छोटीशी गोदावरी नदी – सगळीकडे हिरवेगार आणि छान.

यावेळी श्री **साई कविसंमेलन** पहायला मिळाले. माझे आजोबा अध्यक्ष होते. श्रीराधाकृष्ण स्वामी पण आले होते. त्यांच्याबरोबर बसण्याचा योग आला. निरनिराळया भक्तांनी स्वतः रचलेली बाबांची गाणी म्हटली. मी पण मोठा झाल्यावर म्हणायचे मनात ठरवले.

रात्री परत **शेजारती** म्हणजे बाबांना झोपण्यासाठी केलेली आरती– बाबांना झोपण्यासाठी आरती करताना बघितली आणि मला आठवण झाली माझ्या आजोबांनी, मला झोपवताना ते पण गाणे म्हणायचे.

एकूण मी शिरडीत जे काय पाहिले ते मला खुप आवडले. आईच्या लहानपणी म्हणे एवढ्या इमारती तिथे नव्हत्या.

आम्ही परत निघालो तेव्हा बस सुरू झाल्यावर सर्वांनी म्हटले "सद्‌गुरू श्रीसाईनाथ महाराज की जय" आणि प्रत्येक जण बाबांच्या देवळाचा कळस दिसेनासा होईपर्यंत पहात होते. मी पण बघत होतो, आणि सहजपणे माझ्या तोंडून शब्द बाहेर आले, आई आपण परत कधी यायच ग! आई म्हणाली अरे वेड्या, आपल्याला बाबांनी बोलवले की यायचे. तोपर्यंत आपले बाबा आपल्या घरी आहेतच ना आपल्याबरोबर! आणि लगेच माझ्या डोळयासमोर उभे राहिले ते माझ्या पुस्तकांच्या खणातील बाबांचे गोड चित्र.

कितीही वेळा शिर्डीला गेलो, तेच तेच पाहिले, तरी कुणालाही परत परत जाण्याची ओढ निर्माण होते, अशी आहे **माझ्या बाबांची शिर्डी.**

# शिरडी आणि साईबाबा

(पान १६ वरून)

करवून घेतली काशीराम शिंप्यास धनाचा गर्व झाल्यानंतर त्यास त्याविषयी दृष्टांत दिला माधवराव तर सतत बाबांजवळच रहात परंतु माधवरावांचा परवानगी शिवाय बाबांकडे जाण्यास परवानगी नसे. दासगणूने आपल्या प्रवचन व किर्तनाद्वारे बाबांची ख्याती दूरवर पसरविली. ह्या व्यतीरिक्त द्वारकामाईत कित्येक दिवस व महिने राहून बाबांच्या आज्ञेनुसार कित्येकानी आपले कल्याण साधले व जे बाबांच्या इच्छेविरुद्ध गेले त्यांचे काहितरी अघटीत व्हावयाचे. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. ह्या सर्वावरून एकच निष्कर्ष निघतो की बाबा सर्वभूती आहेत, होते व सर्वांविषयी त्यांना समान आदरभाव होता.

बाबांनी आपल्या शिरडीत राहून आपल्या भक्तांना ज्या प्रमाणे चिमणीच्या पायास दोर बांधून आणावे त्याचप्रमाणे आपल्या भक्तांस आपल्याकडे आणले व त्यांना सांगितले की तुम्ही नितीने कर्म करा, चांगल्या वाईट गोष्टीचा विचार असू द्या. बाबांनी आपल्या भक्तांना आपली प्रचीती सुद्धा दाखवून दिली उदाः लोभी माणसास चार दिवसात ब्रह्मांड कसे मिळणार, त्यासाठी अतिलोभ नसावा, जातपात-बद्दल विवरण होणे, मोलकर्णीतर्फे शंकेचे निरसन, लोहाराची मुलगी विस्तवात पडण्या-पूर्वीच बाबांनी वाचविली आणि धुनीमाईंतील पवित्र उदीने कित्येकास रोगमुक्त करून आपले जीवन सुखी करून दिले आणि येन केन प्रकारे बाबा लोककल्याणा-साठी झिजले व परोपकार्थ केले. आपल्या अंतःमनाने ते दुसऱ्याचे मन तात्काळ ओळखीत व नींदा-नालस्ती आणि खोट्या माणसास बाबांकडे थारा नसे. अशा-प्रकारे बाबांनी आपल्या शिरडीत लोककार्य करून ते भक्तांचे व आपले सर्वांचे आवडते बनले.

प्रत्येकाची भक्ती वेगवेगळ्या स्वरुपाची असते, कोणी फक्त फूल वाहून आपल्या इष्ट दैवताची पूजा करतो, कोणी फुलांचा भला मोठा हार घालून किंवा कुणी फक्त नमस्कार करून, परंतु मी मात्र माझी साईभक्ती माझ्या परीने जितकी नीटनेटकी व चांगली कशी करता येईल त्याचाच विचार करते. परंतु साईभक्तींत विशेषतः श्रद्धा, सबूरी व नेहमी बाबांचा धावा त्याचबरोबर रोज पूजाअर्चा चालू आहेच परंतु मला मात्र एक आढळून आले आहे की बाबांच्या भक्तीने मनास शांतता लाभून मन स्थिर होऊन कुठल्याच गोष्टीचा विचार मनात शिवेनासा होतो. ही माझी छोटीशी पूजा बाबांनी गोड मानून मला उपकृत करावे हीच श्री साईनाथांचे चरणी प्रार्थना.

बाबा मला वाचवा हो ! बाबा तुमच्या शिवाय मला ह्या अडचणीतून कोण बरे सोडविणार. अशी दयार्द्रतेने याचना केल्यास श्री साईबाबा नक्कीच धावून येतात व मला तशी कल्पना सुद्धा आली आहे. कारण मी इयत्ता ९ वीत असताना मला खरजेसारख्या घाणेरड्या रोगाने त्रस्त केले होते व बरोबर १ वर्ष झाले तरी कुठल्याही औषधाने गुण येईना ज्यावेळी मला ह्या दुखण्यातून श्री बाबांनीच सोडविले; त्यावेळी मी सारखा बाबांचा धावा करीत होते व अखेर बाबांनी माझ्या हाकेस ओ दिली. दुसरा प्रसंग म्हणजे माझे बंधु सुद्धा साईभक्त असून; त्यांच्या योगेच मला ही प्रेरणा मिळाली व मी बाबांचे भक्त बनले. एके दिवशी रात्री माझ्या आईस ताप आला परंतु माझ्या भावाने बाबांच्या फोटोजवळ या बाबतीत मागणे मागीतले आणि लागलीच थोड्या वेळाने आई म्हणाली की तिच्या कानात कोणीतरी फुंकर घातली व दुसरे दिवशी आईस ताप वगैरे आला नाही. तात्पर्य बाबा नेहमी भक्ताच्या पाठीशी उभे आहेत.

नित्य नेमाने मी माझ्या भक्ती-रुपी साधनेत भर घालते, हे बाबा माझी अल्पशी भक्ती गोड मानून घ्या; व तुमच्या आशीर्वादाचे कृपाछत्र माझ्यावर असेच निरंतर राहो; माझ्या भक्ती रुपी पूजेचे नाजूक फुल कधीही न कोमेजता सदैव ताजे रहावे हीच प्रार्थना नित्यनियमाप्रमाणे मी बाबांची प्रार्थना करीत असताना माझ्या अभीरूची साधनेमध्ये जे अडथळे येतात ते निवारण करण्यासाठी माझा साध्य हेतू मी बाबांजवळ व्यक्त करिते आणि बाबा माझे हेतु साध्य करितात.

धन्य ते श्रीसाईबाबा धन्य ती शिरडी धन्य ते शिरडीजन आणि धन्य आपण वाचक मला जे काही दोन-चार शब्द आपणापुढे लिहिता आले ते मी बाबांच्या इच्छेनेच लिहिले.

" साई रहम नजर करना, बच्चोंका पालन करना "

श्रीसाईबाबा संस्थानच्या

# नव्या भोजनगृह वास्तूचे भव्य उद्घाटन—

श्री साईबाबा संस्थान शिरडीच्या नव्या अत्याधुनिक भोजनगृह वास्तूचे नाव 'साईप्रसाद' असे ठेवण्यात आले असून या वास्तूचे रितसर उद्घाटन न्यायमूर्ती श्री. एन. के. पारेखसाहेब यांचे शुभहस्ते सोमवार दिनांक २५ ऑगस्ट १९८० रोजी करण्यात आले. या समारंभाचे अध्यक्षस्थानी श्री. का. सी. पाठकसाहेब माजी कोर्टरिसिव्हर श्री साईबाबा संस्थान शिरडी हे होते. या नूतन भव्य वास्तूचा कोनशिला समारंभ प. पू. मुक्तानंद स्वामीजी यांचे शुभहस्ते १९-२-७८ रोजी करण्यात आला होता.

श्री साईबाबांच्या शिरडीस भक्तांची लागलेली रीघ व त्यामुळे जुन्या भोजनगृहात होणारी अपुरी जागा भक्तांचा वाया जाणारा वेळ या सर्व गोष्टी जाणून घेऊन नव्या भोजनगृहाची कल्पना श्री. पाठकसाहेबांच्या कारकिर्दीत पुढे आली, ती मंजूरही झाली, बांधकाम सुरू झाले व नव्या भोजनगृहाचे स्वप्न आज साकार होत आहे याबद्दल सर्वांनाच अत्यानंद होत आहे असे उद्गार श्री. क. हि. काकरेसाहेब, कोर्टरिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांनी आपल्या भाषणातून काढले, व या समारंभास उपस्थित असलेल्या साऱ्यासाऱ्यांचे व नव्या वास्तूस सहाय्यभूत होणाऱ्या साऱ्यासाऱ्यांचे मनापासून आभार मानले. आपल्या भाषणाच्या सुरुवातीस त्यांनी अध्यक्ष व उद्घाटक यांचा परिचयही करून दिला.



समारंभाच्या व्यासपीठावर डावीकडून उजवीकडे श्री. व्ही. एस. आपटे मुख्य लेखाधिकारी, श्री. आठल्येसाहेब वास्तूशास्त्रज्ञ, श्री. काकरेसाहेब, कोर्टरिसिव्हर श्री. पाठकसाहेब माजी कोर्टरिसिव्हर, श्री. पारेखसाहेब समारंभाचे उद्घाटक, सौ. पारेख, सौ. पाठक, कु. रेखाताई दिघे व श्री. तलगिरी साहेब



समारंभाचे अध्यक्ष माननीय श्री. का. सी. पाठकसाहेब (मध्यभागी धोतर नेसलेले)
त्यांचे शेजारी श्री. क. हि. काकरेसाहेब, सौ. पाठक, श्री. व सौ. पारेखसाहेब
श्री. तलगिरी, श्री. आठल्ये व इंजिनियर श्री. डी. सी. पाटील




श्री साईप्रसाद वास्तूत अध्यक्ष, उद्घाटक व न्यायालय धारक

# माहेराच्या वाटेवर

—डॉ. के. भ. गव्हाणकर
इंदिरानिवास, आग्रारोड कुर्ला ७०

(मुंबापुरीतील प्रसिद्ध साईभक्त व बाबांचे चर्मचक्षूंनी अनेकवार दर्शन सौख्य घेतलेले भाग्यवान डॉ. केशव भगवंत उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर यांनी गेली ४९ वर्षे सतत न चुकता कोजागिरी पौर्णिमेस आपल्या साईभक्त मित्र मंडळी समवेत शिरडीची वारी केली. यंदा ता. २३ ऑक्टोबर रोजी कोजागिरीची त्यांची ५० वी वारी आहे. डॉ. अण्णासाहेब हे श्रीसाईबाबा संस्थानचे माजी अध्यक्ष व श्रीसाईलीलाचे भूतपूर्व संपादकही होते. अण्णासाहेबांना आम्ही दीर्घायुरारोग्य चिंतून या वारीनिमित्त त्यांनी घेतलेला ऐतिहासिक आढावा येथे देत आहोत. —का. संपादक)



डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर

एका जनार्दनी शरण । करी माहेरची आठवण ॥

माहेरचे कुत्रेही जीवाला अत्यंत प्रिय होते, कारण माहेरी भोगलेले सुख इतत्र भेटत नाही. त्या कासाविशीत माहेरच्या सुखाचा आठवहि त्या कुत्र्याच्या दर्शनाने अत्यंत शीतल असा वाटतो.

जीवाना व देवानाही माहेरचे अखंड सुख भोगण्याला संतांच्या दारी गेले पाहिजे. म्हणून श्री साईबाबांनी आश्विन पौर्णिमा-कोजागिरी-वारी पत्करली, तेव्हा आम्ही वारकरी ( साईभक्त ) शिरडीला जातो ते श्री साईबाबाला सवंगडी बनवून आईला भेटण्यासाठी.

संत जेथे जन्म घेतात तिला ते पुण्यभूमि, महाक्षेत्र करून ठेवतात. सकलसंतांचे राजे श्री ज्ञानदेव आळंदी क्षेत्रात प्रेमसाम्राज्याचे राज्य चालविण्यासाठी अवतरले तर या विसाव्या शतकात श्री ज्ञानेश्वरानंतर श्री साईमाउली प्रगटली. यांचा

जन्म, जन्मस्थळ व मातापिता कोण ? याचा पत्ता अद्याप लागत नाही तर त्यांचे महिमान काय वर्णन करावे ? इवलेसे ते शिरडी गाव पण किती नयनमनोहर, किती हृदयात सखोल जाऊन बसलेले ! कै. दासगणूमहाराज या भूमीचे वर्णन "शिरडी माझे पंढरपूर । साईबाबा रमावर ॥" असे करतात, आणि ते किती साच, किती गोड ! का तर माझा 'साईराजा विठू' तेथील सर्वांचे हृदय शिरडीपूर करून राज्य करीत आहेत.

शिरडी हे भूवैकुंठ-पंढरपूर आहे. तेथे महाराष्ट्रातील नव्हे, हिंदुस्थानातील नव्हे. जगाच्या पाठीवरील सर्व देशातून-परदेशातून प्रतिवर्षी संत-भक्त-मुमुक्षु धावत येतात, आणि ते धावणे किती गोड असते ! आपली घरे दारे वाऱ्यावर सोडून त्या वाटेला निघते. नव्हे श्री साईंने नेमलेले कर्म, दिलेले खोपटे सोडून आईच्या पान्ह्याची आठवण होऊन तिच्या कुशीत लपावे म्हणून धावते. विश्वात सर्व थोर थोर तत्त्वज्ञ झाले पण माऊलीपणा भेटविण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नाही. पण माझी माऊली साई तशी नव्हे मग तिची आठवण का येऊ नये.

१९३० सालच्या कोजागरी पौर्णिमेला कै. रघुवीर भास्कर पुरंदरे ट्रेझरर व ट्रस्टी व कै. यशवंत जनार्दन गाळवणकर-ट्रस्टी शिरडी संस्थान कमेटी, यांनी 'कोजागिरींची माळ माझ्या गळयात घातली ती आजपर्यंत ४९ वर्षे माउलीने पार पाडली व पुढेहि करून घेईल हे निश्चित.

आज श्रीसाईमाउलीला देहानी जाऊन ६२ वर्षे झाली पन्नासावा (५०) पुण्यतिथी महोत्सव झाला. आई आपल्या बालकांना भेटण्यासाठी ४–१०–१९६८ रोजी पादुकांच्यारूपाने मुंबईस आली होती. त्या सोहळयाचे वर्णन करणे अवर्णनीय आहे.

आमची कोजागरी वारी म्हणजे कोजागरी पौर्णिमेला सकाळी ७ वाजता स्पेशल एस. टी. ने कुर्ला स्थानकातून निघते ती दुपारी ४ वाजेपर्यंत शिरडी मुक्कामी येते. काय सांगू त्या वाटेवरचा गोडवा ! ती भक्तांच्या सर्पाकृति नाचण्याप्रमाणे वळणे घेणारी हिरवीगार गिरीकंदरातील घाट, ती मनोहर गोड गुलाबी थंडी–आणि सर्वांना मोहविणारा साईचा वेधाचा तो रस्ता 'जाता तया गावा चित्ता वाटे समाधान' असेच सर्वांना वाटते.

'शीतल हा पंथ माहेराची वाट' अंतरबाह्य हे वचन खरे असते, शिरडीच्या वाटेवर रम्य वनराई–मंजुळ नाद करणारी निर्झर श्रीसाईबाबांना अति आवडते म्हणून त्यांची विपुलता वाटेवर बालकांना भेटली यात नवल काय ?

'जेथे अमृताचेनि पाडे । मुळाहि सकट गोडे । जाइती दाटे झाडे । सदा फळति । पाऊला पाऊला उदकें । वर्षाकाळेवीण अति चोखें । निर्झर का विशेखें । सुलभे जेथ । हा अतपुहि आलुमालु । जाणिजे तरी शीतळू । पवनु अति निघळु । मंद झळके ।

अशा गोड गर्द वृक्षराईतून सुंदर खोऱ्यातून घाटमाथ्यावरून जाताना काय आल्हाद होतो म्हणून सांगू ! सभोवार सर्व पिके बहाराला आलेली. ती गोड गुलाबी थंडी आणि ते रम्य मनोहर निर्झर यांची समृद्धि मार्गावर भेटते. उपवनातील सूर्याच्या मंद किरणातून नहात, नाचत, छंदे छंदे चाललेली भक्तांची मांदी शारिरीक व मानसिक उल्हासाने परिपूर्ण असते. राजालाहि अगम्य अशी वनातील आरोग्यसंपन्न व प्रेमसुखसंपन्न वाटचाल मुद्दाम वनसंचारासाठी जाऊनहि मिळण्यासारखी नाही.

बाह्यसुखाच्या परिपूर्णतेप्रमाणे अंतरीचे सुखहि परमोच्च गोडीने वेल्हावत, अभंगाच्या भावगीतांच्या ढोलकीच्या गोड नादात गुंतलेले दुपारी ११ च्या सुमारास नाशिकक्षेत्री येतो. तेथे पोटोबा करून जे निघतो ते सायंकाळी चार वाजता गात, गात, आनंद लुटत लुटत शिरडी मुक्कामी येतो. अशा या रमणीय प्रियजीवनात दिवसभर परमार्थ ऊन, तहान, वारा तारीख, घरची आठवण, न आठवता वहात असावेत असे ते ते मधुरसंवेदनीय गुंगीप्रमाणे जीवन असते.

रात्री नऊ वाजता प्रवचन व श्रीसाईबाबांची व चंद्राची कोजगिरीची पूजा होते काय थाट विचारावा ! चंद्राचे प्रतिबिंबाची केशरी मसाल्याच्या व नारळाच्या पाण्यात पूजा व आरती, नंतर दूध, पोहे, खिरापत वगैरेच्या प्रसादानंतर खरी कोजागिरीची सुरवात होते. सबंध रात्र भजन, भावगीते, नाच, नकला, ढोलकीवादन यांच्या गोड मधुर सुरेख नादात व असंख्य भक्तजनांच्या मेळाव्यात रात्र केव्हा निघून जाते ते कोणालाच समजत नाही.

दुसरे दिवशी सकाळी नऊ वाजता द्वारकामाईत आईच्या सानिध्यात-विष्णुसहस्त्रनामाचे सामुदायिक वाचन. या वेळेस द्वारकामाईच्या मंडपात भक्तांच्या सुरेख नादात 'दुमदुमली पंढरी' व "सोनियाचा दिनू आजि आमृते पाहिला" असेच वाटते. ठीक दुपारी १२ वाजता श्रीसाईबाबांची समाधी मंदिरात आरती होते.

माध्यान्ह आरतीचा सोहळा काय वर्णावा ? एका बाजूला पुरुष तर दुसऱ्या बाजूला स्त्रीसमाज व मध्ये रिकामी जागा तेथे भालदार, चोपदार, पेटी, तबला, व पंचारती त्या सर्वांच्या कर्णमधुर गुंजारवात मन मुग्ध मोहून जाते, आरती नंतर प्रसाद वाटतो.

ठीक एक वाजता भंडार – त्यात जवळ जवळ दोनशे साईभक्त भाग घेतात. आपण लाखो रुपये देऊ केले तरी आईच्या प्रियतेचा हात बाळपणी अंगावर फिरला तसा फिरवायला आता लाभणे कठीण आहे. आपण जीवित देऊ म्हटले तरी प्रियविरहाची माऊली बाळाची मधुर वचने ऐकावयाला व अंतरातून स्पष्ट करायला

मिळणे कठीण, त्या सुखाचा वर्षाव आसिन्नले प्रसन्नतेचे मळे। असा प्रत्येक जिवलगाच्या मुखावर चमत्कार असलेले पाहून जीव त्या सुखाला कसा भुलत असेल हे, सांगणे नको. ' यारे यारे लाहान थोर, ते सुख भोगून जा एवढे त्याबदल सांगता येईल.

गुरूवार असला तर आनंदाला सीमा रहात नाही श्री बाबांच्या पादुका - जोडे – व छत्री पालखीत ठेवतात व पालखी द्वारकामाईतून निघाली की ती चावडीत जाते तेथे आरती होऊन नंतर समाधी मंदिरात येते.

पालखी निघाली म्हणजे मिरवणुकीस आरंभ झाला, माऊली भेटली या तंद्रीत मोठ्या थाटाने नटून थटून सजून, गूरू टक्के, शंख भेरी, तुतारी, चौघडा, लेझीम व भजने, रेशमी व जरीची निशाणे फडकावीत ' मातले वैष्णव करिती नामाचा घोष ' 'साईबाबामाऊली ' वगैरेच्या गजरात पालखी हळु हळु समाधी मंदिरात येते. तेथे ( कोजागिरी पौर्णीमा खेरीज ) शेजारती होते व पोहे प्रसादाची वाट वगैरे झाल्यावर श्री बाबांची झोपण्याची तयारी – मच्छरदाणी, पाण्याचा तांब्या, चिलीम, सटका– करून मग भक्तगण आपल्या बिऱ्हाडी जातात.

तिसरे दिवशी सकाळी पहाटे सूर्योदयपूर्वी आईच्या प्रेमाची काकड आरती नंतर, समाधीला मंगल स्नान सोहळा व नंतर भक्तांची अभिषेकाची व दर्शनाची रीध हे सर्व उरकून संस्थान भोजन गृहात प्रसाद घेऊन ठीक १२ वाजता वारी परत मुंबईच्या वाटेला लागते.

प्रेमप्रभु श्री साईरायाचे नाम जीवी जडवून जाण्याऱ्या वारकऱ्यांची महती आणखी काय सांगावी! हे. गीत केवळ मुखाने गायचे, ते अर्थ जाणून नव्हे, लक्ष लावून नव्हे तर केवळ आवडीने, मुखाने नुसता उच्चार करणे आहे. " आई," म्हणून बाळ प्रियमातेचा आठव करते, तेव्हा ते त्या शब्दाचा अर्थ काय ? त्या आईपाशी लक्ष जडते काय ? ' हरि मुखे म्हणुन एवढेच येथे पुरे आहे. जो माझे जीवन चालवितो तो मायबाप श्री साई उच्चारासरशी मला भेट देतो एवढेच स्वामी पुरे.

आम्हा वारकऱ्याचा मंत्र एवढा वरिष्ठ, देवहि वरिष्ठ, तो श्रीसाई कर्मधर्मांचा पाप पुण्याचा धनी नाही. तो येणारा जाणारा नव्हे. अखंड जीवाचा जीवन जीवाशी सतत मिळून प्रेमाने पालन करणारा प्रेमप्रभु असा एकमेव देव आहे. श्रेष्ठ श्रेष्ठ साधन करणारे उच्चवर्णीय तरी वारकऱ्याप्रमाणे एका देवाचे उपासक आढळतात कां? ज्यांचा देवच एक नाही. ज्यांना देव आहे की नाही हा अद्याप संशय आहे पण स्वकर्तव्याने

साधन करून देव घडवू या अशी ज्यांची भावना आहे, ज्याचा देव मोक्षरूप आहे अशा अनंत उलाढाली व प्रभुसुरवाला मुकलेल्या व वरून मात्र लख्ख पवित्र सोवळ्या आचाराच्या व साधनांचे काबाड उपासता उपासता जीवन दुःखमय घालवणाऱ्या वारकऱ्याची निंदा करणाऱ्या साधकापेक्षा, संसारी राहून हरिनामात प्रेममय–साईमय–संसार भोगणारे वारकरी अधिक भाग्याचे श्रेष्ठ सुखाचे नाहीत का ?

आम्ही परत येताना आनंद–दुःख मिश्रित नाशिकला येतो. घाट उतरताना दूरवर दिसणारा परिसर, पुढे डोळ्याना सर्पाकृती घाटाची, वृक्षराजीयांच्या हिरव्या निळसर गोड छायेची मेजवानी आणि भजनानंदाने सर्वांग पुलकीत होत. अशा थाटात तो घाट केव्हा उतरून येतो हे ध्यानी येतच नाही व रात्रीच्या रात्री अ ाठच्या सुमारास मुंबई–कुर्ला गाठतो.

माझे माहेर शिरडी जेथे माझी दृष्टि सोलीव झाली, पुनर्जन्म झाला आई श्रीसाई ही सर्वांची माउली खरी माउली हा शब्दच प्रियतेच्या क्रियेचा मुकुट आहे. मुकुट हे विशेषणसुद्धा माऊली शब्दाला पुरत नाही, कारण मुकुट पहाण ारा त्याहून निराळा राहतो. ज्या प्रियतेला पहाताच, तिचे स्मरण होताच मीपणा उरत नाही तो हरून जातो, तो शब्दच माउली उच्चार आई वचनापेक्षा अधिक गोड आहे. आई हा शब्द क्रियारूप प्रियतेला आहे. जेथे मीपणा प्रियतेत बुडून केवळ स्वप्रियप्र तीतिच उरते तो प्रियतेचा उच्चार माउली श्रीसाई आहे.

माउली आई श्रीसाई ही अत्यंत श्रीमंत आहे. बाकीचे श्रीमंत इतरावर टिकलेले; आणि त्यांनी आपले घर, दार, द्रव्य दुसऱ्याला द्यावयाचे म्हटले तर ते स्वतः दरिद्री व्हावयाचे माऊली श्री साईची श्रीमंती त्या जातीची नाही, ती स्वयंभू स्वतःमध्येच व्यक्त व्हावयाची, इतरांकडून मिळवावयाची नव्हे, त्याप्रमाणे सर्व जगाने लुटली व कितीहि लुटली तरी संपणारी नव्हे उलट वाढतच राहील. शक्ति बानाचे स्मरण करून आपणाला शक्ति येईल का ? पण आई श्रीसाईच्या स्मरण ाने जीव सहज माउलीरूप होतो. म्हणजे निजज्ञानच माउली होऊन भेटते. ज्ञान हे नेहमी कर्माशी तादात्म्य पावते, तेच निजज्ञानाचे निरिक्षण करू लागले म्हणजे स्वप्रेमाकडे चालले म्हणून समजावे–" निरखित निरखित गेलीये । पाहे तव तन्मयची झालीये वो ॥ " हा अनुभव वारीत आम्हा सर्वांस मिळतो, माउलीची ओढ लागते व ' कई तो दिवस देखेन मी डोळा । कल्याण मंगळा मंगळाचे ॥ ' असे होते हे वारीचे सुख अनुभवण्यात, जीवनाची सार्थकता होते. वाटेत प्रेमाची रेलचेल, देवाणघेवाण, माउली साईची प्रत्यक्षता–' विषयी विसरला निःशेष ब्रह्मरस ठसावला ॥' ही स्थिती

होते. कर्म, ज्ञान, व भक्ति या तिघांचा मिळाप एका प्रेमात, ज्याच्या नसानसात संचार होऊन आनंदाने बेहोष होऊन वागत असतं.

वारी संपल्याची जाणीव होते पण घडी घडी भोगलेले सुख आठवणीने उफाळते, ते सतत असावे ही सर्वांच्या जीवात आवड राहते म्हणून सतांना " पंढरीचा वारकरी। वारी चुको नेदी हरि। (श्रीसाई)' प्रार्थना संवेदनानी गोड अवधान देऊन ऐकावी हीच शेवटची विनंती.

नव्या भोजनगृह वास्तूचे भव्य उद्घाटन



संस्थानच्या नवीन भोजनगृहातील एका पंगतीचे दृश्य